दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१४४ | गुरुवार दि.१३ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## सातबारावर नाव नसलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील ज्या शेतकऱ्यांची नावे सातबारा उताऱ्यावर नाहीत किंवा इतर अधिकारात ज्यांच्या नावांची नोंद नाही, अशा सर्व शेतकऱ्यांना रेकॉर्डवर आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांचा 'ॲग्रीस्टॅक' मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असून, त्यांना कर्जमाफी आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळणे सुलभ होणार आहे. यासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत.**



### चंद्रशेखर बावनकुळे काय म्हणाले?

या सर्व अडचणींची दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने पावले उचलली आहेत. ''जे शेतकरी आहेत, परंतु त्यांचे नाव सातबारा किंवा इतर अधिकारात नाही, अशा शेतकऱ्यांच्या जमिनीची सर्व कागदपत्रे गोळा करून सहकार विभागाकडे पाठविण्यात येतील. यासाठी एक स्वतंत्र फॉरमॅट तयार करून सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून १५ दिवसांत अहवाल मागविण्यात यावा,'' असे निर्देश त्यांनी दिले आहेत. लवकरच जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन याबाबतचे अंतिम आदेश निर्गमित केले जातील.

मंत्रालयात महसूल मंत्र्यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला मत्स्योद्योग मंत्री नितेश राणे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार निलेश राणे आणि आमदार दीपक केसरकर, महसूल व सहकार व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.राज्यामध्ये सध्या तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांचे 'ॲग्रीस्टॅक' निघत नसल्याची गंभीर बाब समोर आली होती. यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी होत्या. राज्यात सुमारे ५० हजार शेतकरी मयत आहेत, ज्यांच्या नोंदी अद्ययावत नाहीत. १० हजार प्रकरणांमध्ये जमीन वडिलांच्या नावे असून, मुलाचे नाव अद्याप सातबारावर लागलेले नाही.शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या 'कबुलायतदार' जागांवर सरकारचे नाव लावण्यात आले आहे. परिणामी, अशा शेतकऱ्यांना पीककर्ज मिळत नाही आणि घेतलेल्या कर्जाला कर्जमाफीचा लाभही मिळत नाही. एकट्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात १,२०७ शेतकऱ्यांचे 'फार्मर आयडी' अद्याप निघालेले नाहीत. तर राज्यातील ही संख्या २ लाख ३१ हजार आहे.ज्या शेतकऱ्यांकडे देवस्थान, कबुलायतदार, इनाम किंवा वतन जमिनी आहेत, त्यांनाही सर्व शासकीय सुविधा मिळाव्यात या उद्देशाने एक विशेष फॉर्म तयार करण्यात येणार आहे. यामुळे भविष्यात या शेतकऱ्यांनाही 'ॲग्रीस्टॅक' काढण्यासाठी मोठी मदत होणार आहे. सहकार आयुक्तांनी स्पष्ट केले आहे की, पात्र शेतकऱ्यांची यादी लावण्यात आली असून, ज्यांचे ॲग्रीस्टॅक निघू शकत नाही, त्यांच्याकडून इतर पर्यायी कागदपत्रे घेऊन मार्ग काढण्यात

▶▶ पान २ वर

## पेपरफूट गैरप्रकारबाबत केंद्राचा कायदा राज्यात लागू

### परीक्षा पद्धती सुधारणांसाठी उच्चस्तरीय समिती; मुख्यमंत्र्यांचे निर्देश

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होणाऱ्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सुद्धा उपस्थित होते, त्यांनीही अनेक उपयुक्त सूचना या बैठकीत केल्या. राज्यात गेल्या काही वर्षात सातत्याने होत असलेल्या पेपरफुटी, आणि महत्वाच्या परीक्षांमधील घोळांच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला.**




वर्षा निवासस्थानी आज विशेषत्वाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे निर्देश दिले. ही उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरेल.अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत एक कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही

▶▶ पान २ वर



## राज ठाकरे मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' बंगल्यावर!

मुंबई । प्रतिनिधी

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भल्या सकाळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अचानक भेट घेतली. राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांची अधिकृत निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्यावर जाऊन फडणवीस यांची भेट घेतली व त्यांना पुष्पगुच्छ दिला. मागील काही दिवसांपासून राज ठाकरे राज्य सरकारवर अत्यंत आक्रमकपणे टीका करत असतानाच ही सरप्राइज भेट झाल्यामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### मुंबईत इमारतीला भीषण आग; २ ठार

मुंबई : पश्चिम उपनगरातील विलेपार्ले ( पश्चिम) परिसरात मंगळवारी रात्री एका निवासी इमारतीच्या ११ व्या मजल्यावर लागलेल्या भीषण आगीत एक तरूणीसह अडीच वर्षांच्या लहानग्याचा होरपळून मृत्यू झालाय. या घटनेत एकूण ४ जण जखमी झाले असून पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.विलेपार्ले येथील बॅप्टिस्टा रोडवरील शांता भवन या १२ मजली इमारतीला मंगळवारी रात्री अचानक आग लागली. ही आग इमारतीच्या ११ व्या मजल्यावरील दोन फ्लॅट्समध्ये ही आग लागली होती. मुंबई अग्निशमन दलाला मिळालेल्या माहितीनुसार मंगळवार, ११ ऑगस्टच्या रात्री अग्निशमन दलाला आगीची प्रथम माहिती मिळाली होती. घटनेची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल आणि मुंबई पोलीस तातडीनं घटनास्थळी दाखल झाले होते.

### आय वरून मार्क झुकरबर्ग यांचा अमेरिकेला इशारा

नवीदिल्ली ; मार्क झुकरबर्ग यांनी एका दीर्घ निबंधात डेव्हलपर्सकडून बाजारात पसरवल्या जाणाऱ्या भीतीवजा वातावरणावर कडक शब्दांत टीका केली. तंत्रज्ञान सुरक्षित ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यावर निर्बंध लादणे नसून, त्याची ताकद जगातील लाखो डेव्हलपर्सच्या हाती देऊन चीनच्या वाढत्या प्रभावाला रोखणे हाच आहे, असे त्यांनी ठामपणे मांडले. चीनला मागे टाकण्यासाठी अमेरिकेला एक महत्त्वपूर्ण सल्ला दिलाय, या अँगलने देखील या सल्ल्याकडे पाहिलं जात आहे.जागतिक स्तरावर आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या क्षेत्रात अमेरिका आणि चीन यांच्यातील तांत्रिक शीतयुद्ध तीव्र झाले असतानाच, मेटा कंपनीचे सीईओ मार्क झुकरबर्ग यांनी १० ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या आपल्या विशेष निबंधात अमेरिकन प्रशासनाला एक अत्यंत महत्त्वाचा तांत्रिक सल्ला दिला आहे. झुकरबर्ग यांच्या मते, जर अमेरिकेला एआय तंत्रज्ञानाच्या जागतिक शर्यतीत चीनला मागे टाकायचे असेल, तर एआय मॉडेल्सवरील मोजक्या बड्या कंपन्यांचे नियंत्रण तात्काळ हटवून 'ओपन-सोर्स' मॉडेलचा स्वीकार करावा लागेल.

### तुकाराम मुंढेंच्या उपस्थितीत बैठक; शिंदेंचे आदेश

मुंबई: नागरिकांच्या, विशेषतः लहान मुलांच्या जीवाशी खेळणाऱ्या दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळखोरांवर संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करावेत, अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी दिल्या. सह्याद्री अतिथीगृह येथे 'विकसित महाराष्ट्र २०४७'अंतर्गत सन २०२६-२७साठी विभागनिहाय निश्चित केलेले टप्पे आणि त्यांच्या पूर्ततेसाठी सुरू असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. या बैठकीत अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सादरीकरणादरम्यान उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या सूचना केल्या.'अन्नभेसळ हा साधा गुन्हा नसून तो थेट नागरिकांच्या, बालकांच्या जीवाशी खेळ आहे. बनावट पनीर, भेसळयुक्त अन्नपदार्थांमुळे कर्करोगासारख्या दुर्धर आजारांना सामोरे जावे लागू शकते. भेसळखोर समाजकंटकांवर 'मकोका'अंतर्गत कारवाई करून त्यांच्यावर जरब बसवावी,' असे एकनाथ शिंदे म्हणाले.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१० ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३१.५० क्विंटल | २,५०० | २,९२१ | २,६५४ |
| ज्वारी/हायब्रिड: ११६.०० क्विंटल | २,४१० | ४,८७६ | २,८९६ |
| मका/लोकल: १०.०० क्विंटल | २,४३५ | २,४३५ | २,४३५ |
| तूर : २.०० क्विंटल | ६,५०१ | ६,५०१ | ६,५०१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १०२.५० क्विंटल | २,३०० | २,९०१ | २,५८५ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,००० | ५,९६१ | ५,४८० |



## ठाकरेंच्या वकिलांकडून निवडणूक आयोगाची चिरफाड

नवीदिल्ली । वृतसंस्था

**निवडणूक आयोगाने पक्षफुटीचा निर्णय देण्याआधी दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रतेचा निर्णय महत्त्वाचा होता. पण आयोगाने शिंदेंना लाभ देण्यासाठी आधी निकाल ठरवला आणि त्यानुसार कारणे ठरवली, असा मोठा आरोप ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला. निवडणूक आयोगाने २०१८ सालच्या शिवसेनेच्या घटनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. शिवसेना पक्ष आणि चिन्हासंबंधी न्यायालयात सुनावणी सुरु आहे. ठाकरेंच्या वतीन ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यानी युक्तिवाद करत निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर आणि अधिकारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.**

कपिल सिब्बल म्हणाले की, ''२०१८ सालची घटना शिंदे गटाला मान्य नव्हती. मात्र त्याच घटनेच्या आधारे शिंदे आमदार आणि मंत्री झाले. २०१८ ची घटना ही बनावट असल्याचा आरोप होता तर त्यावर निवडणूक आयोगाने कारवाई करायला हवी होती. पण एकनाथ शिंदे यांना लाभ

▶▶ पान २ वर

## खासगी रुग्णालयांतील दरमर्यादेचा नियम योग्यच

नवी दिल्ली । प्रतिनिधी

देशातील सर्व खासगी रुग्णालयांनी केंद्र सरकारने निर्धारित केलेल्या कमाल व किमान मर्यादेच्या आतच शुल्क आकारणे सक्तीचे करणारा नियम घटनात्मकदृष्टया पूर्णपणे वैध आहे, असे केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले आहे. तथापि, या दरांची मर्यादा निश्चित करण्याबाबत विविध राज्यांमध्ये अद्याप एकमत न झाल्याने ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचू शकलेली नाही, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.



बार अँड बेंचने दिलेल्या वृत्तानुसार क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट्स (सेंट्रल गव्हर्नमेंट) रूल्स, २०१२ मधील नियम ९ (२) ला आव्हान देणारी याचिका ऑल इंडिया

▶▶ पान २ वर

## शिंदे समितीने ५८ नव्हे फक्त २१ लाख कुणबी नोंदी शोधल्या

नागपूर । प्रतिनिधी

राज्यात पुन्हा एकदा मराठा आरक्षण आणि ओबीसी जात प्रमाणपत्रावरुन वातावरण तापलं आहे कुणबी मराठा बांधवांना मिळालेली जात प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. त्यावरुन, जरांगे पाटलांनी मुख्यमंत्री, महसूलमंत्री यांच्यावर जोरदार टीका केली. तर, दुसरीकडे ओबीसी नेतेही जरांगे पाटील यांच्या टीकेला आणि जात प्रमाणपत्र रद्द होण्यासंदर्भातील वक्तव्यावरुन पलटवार केला जात आहे. लक्ष्मण हाकेंनी जरांगे पाटलांवर टीका केल्यानतंर आता ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवडे यांनीही ५८ लाख नोंदीबाबत माहिती दिली आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने मराठा

▶▶ पान २ वर

## अमित शाहा संसदेचा सामना करू शकत नाहीत–गांधी

नवी दिल्ली । वृतसंस्था



लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर हल्लाबोल केला आहे. देशातील तरुण पिढीला कोणत्याही पोकळ भाषणात किंवा प्रवचनात रस नसून त्यांना केवळ घडलेल्या घटनांचे सत्य जाणून घ्यायचे आहे, अमित शहा यांच्यात हिंमत नाही. देशाचे गृहमंत्री संसदेचा सामना करू शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांवर झालेल्या पॅलेट गन्सचा वापर आणि लाठीचार्ज प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारत गृहमंत्र्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी आक्रमक मागणी राहुल गांधी यांनी केली आहे.

राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांवर

▶▶ पान २ वर

## एफडीएची कारवाई; संभाजीनगरमधील 'अमरप्रीत'चा परवाना निलंबित

छ'.संभाजीनगर । प्रतिनिधी

शहरातील जालना रोडवर असलेले अतिशय प्रसिद्ध आणि नामांकित 'मे. हॉटेल अमरप्रीत' येथे जेवणासाठी जाणाऱ्या खवय्यांसाठी एक अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. राज्यभरात राबवल्या जाणाऱ्या या मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने या हॉटेलवर धडक छापा मारला. या तपासणीदरम्यान सडलेल्या भाज्या, मुदतबाह्य अन्नपदार्थ आणि ग्राहकांची उघडपणे होणारी फसवणूक समोर आल्याने प्रशासनाने हॉटेल अमरप्रीतचा अन्न परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित केला आहे.

हॉटेल अमरप्रीतमध्ये ग्राहकांच्या आरोग्याशी अत्यंत घातक खेळ सुरू असल्याचे तपासणीत निष्पन्न झाले आहे. हॉटेलच्या मेनू कार्डवर 'बटर' (लोणी) नमूद करून 'बटर चिकन', 'बटर तंदुरी रोटी' आणि विविध ग्रेव्हीमध्ये अस्सल बटरऐवजी विनालेबल असलेल्या 'मार्गारीन'चा सर्रास वापर केला जात असल्याचा दाट संशय आहे.मार्गारीनमध्ये अतिशय

▶▶ पान २ वर

## महाराष्ट्रात तब्बल ४३ लाख रेशन कार्ड संशयित!

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील रेशन कार्ड आणि सार्वजनिक वितरण प्रणालीबाबत मोठी आणि धक्कादायक माहिती समोर आली आहे. राज्यात रेशन व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी राबवण्यात आलेल्या विशेष मिशन सुधार मोहिमेदरम्यान तब्बल ४३ लाख ३ हजार संशयित आणि अपात्र रेशन कार्ड आढळून आली आहेत. या प्रकारामुळे अन्नधान्य वितरण व्यवस्थेतील गैरप्रकार पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत.राज्य शासन आता संशयित आणि बोगास कार्डची आणखी एकवेळ तपासणी करून हे कार्ड रद्द करण्यात येतील शिवाय यावर कारवाई देखील करण्याच्या विचारात शासन आहे .**



मिशन सुधार मोहिमेअंतर्गत करण्यात आलेल्या तपासणीत अनेक धक्कादायक बाबी उघडकीस आल्या. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या, तसेच इन्कम टॅक्स भरणा-या काही व्यक्तींकडूनही रेशन कार्डचा लाभ घेतला जात असल्याचे आढळले.याशिवाय मृत व्यक्तींच्या नावावर रेशन कार्ड कायम ठेवून धान्याची उचल करण्यात आल्याची प्रकरणेही समोर आली आहेत. त्यामुळे रेशन कार्ड पडताळणी आणि सार्वजनिक वितरण प्रणालीच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.रेशन धान्याचा लाभ हा प्रामुख्याने गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी असतो. मात्र, अपात्र व्यक्ती तसेच मृत व्यक्तींच्या नावावर धान्याचा लाभ घेतला जात असल्याने प्रत्यक्ष गरज असलेल्या लाभार्थ्यांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. सरकारकडून गरीब आणि गरजू कुटुंबांसाठी मोठ्या प्रमाणात अन्नधान्य उपलब्ध करून दिले जाते. अशा परिस्थितीत रेशन व्यवस्थेतील गैरप्रकार रोखणे प्रशासनासमोर मोठे आव्हान ठरले आहे.दरम्यान, ४३ लाख ३ हजार संशयित रेशन कार्ड प्रकरणे समोर आल्यानंतरही सर्व प्रकरणांवर तातडीने कारवाई झालेली नाही. उपलब्ध माहितीनुसार, तब्बल ३३ लाख ५३ हजार प्रकरणे अद्याप चौकशी आणि पुढील कारवाईच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या कारवाईच्या

▶▶ पान २ वर

## नीट परीक्षार्थींना चुकीच्या शहराचे एसएमएस

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**नीट परीक्षांचा गोंधळ संपताना दिसत नाही. नीट-पीजी २०२६ च्या उमेदवारांना चुकीच्या परीक्षाकेंद्रांच्या ठिकाणांचे एसएमएस गेल्याच्या तक्रारी आल्या. यानंतर आता नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस (एनबीईएमएस) ने बुधवारी सांगितले की, तांत्रिक कारणांमुळे काही नीट-पीजी २०२६ उमेदवारांना एसएमएसद्वारे चुकीच्या परीक्षा केंद्रांच्या शहराची माहिती अनवधानाने पाठवली गेली.**

योग्य परीक्षा केंद्रांचे शहर दर्शवणारे एसएमएस आणि ई-मेल त्यानंतर पाठवण्यात आले आहेत, असेही बोर्डाने यावेळी सांगितले. पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी होणारी नीट-पीजी २०२६ परीक्षा ३० ऑगस्ट रोजी होणार आहे. नीट-पीजी २०२६ अर्जदारांना परीक्षा केंद्रांच्या शहराचे वाटप नियोजित वेळापत्रकानुसार एनबीईएमएसच्या संकेतस्थळाद्वारे कळवण्यात आले आहे असे बोर्डाने उमेदवारांना

▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# अमित शाह स्पष्ट का बोलत नाहीत?

अमित शाह यांनी संसदेत विरोधकांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्याची तयारी दर्शवली आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या कथित पोलिस कारवाईबाबत चर्चा करण्यासाठी ते २४ तास उपलब्ध राहण्याची तयारी असल्याचे त्यांनी बुधवारी सांगितले. विरोधकांनी मात्र चर्चेऐवजी थेट उत्तरांची मागणी केली आहे.

याच ठिकाणी मूळ प्रश्न निर्माण होतोअमित शाह प्रश्नांची उत्तरे देण्यास तयार आहेत, तर नेमका प्रश्न कोणता आहे यावर स्पष्ट भूमिका का घेत नाहीत? राहुल गांधी यांचा आक्षेपही याच मुद्द्यावर आहे. त्यांना संसदेत एखादे सर्वसाधारण भाषण किंवा राजकीय व्याख्यान नको आहे; विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित कारवाईबाबत नेमका आदेश कोणी दिला, कारवाईची जबाबदारी कोणाची आणि सरकारची भूमिका काय होती, याचे स्पष्ट उत्तर हवे आहे. लोकशाहीत चर्चा महत्त्वाची आहे; पण चर्चेच्या नावाखाली मूळ प्रश्न धूसर होणे अधिक धोकादायक आहे. विरोधकांचा प्रश्न जर विशिष्ट असेल, तर सरकारचे उत्तरही तितकेच विशिष्ट असायला हवे. ''आम्ही प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देऊ'' ही राजकीयदृष्ट्या प्रभावी घोषणा आहे; परंतु त्यानंतर होय किंवा नाही, आदेश दिला किंवा दिला नाही, जबाबदारी स्वीकारणार की नाही, अशा स्पष्ट उत्तरांची वेळ येते. सध्या सरकार आणि विरोधक यांच्यातील संघर्ष केवळ संसद चालवण्याचा नाही; तो राजकीय जबाबदारीच्या अर्थावरून आहे. अमित शाह चर्चेसाठी तयार असल्याचे सांगतात, तर राहुल गांधी म्हणतात की ''लेक्चर'' ऐकण्यात रस नाही. दोन्ही बाजूंच्या या भूमिकांमागे राजकीय गणित असू शकते. सरकारला संसदेत व्यापक चर्चेत आपली बाजू मांडण्याची संधी हवी आहे; विरोधकांना मात्र चर्चेचा केंद्रबिंदू बदलू द्यायचा नाही. मात्र या संघर्षात सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे विद्यार्थी. त्यांच्या आंदोलनावर पोलिसांनी कोणती कारवाई केली, ती कोणत्या आदेशाने केली, कोणत्या परिस्थितीत केली आणि त्या कारवाईची चौकशी झाली काया प्रश्नांची उत्तरे राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा अधिक महत्त्वाची आहेत. अमित शाह यांनी ३ वाजल्यापासून दुसऱ्या दिवशी ३ वाजेपर्यंत संसदेत उपलब्ध राहण्याची तयारी दाखवली, ही बाब चर्चेसाठी सकारात्मक पाऊल मानता येईल. पण वेळ देणे आणि उत्तर देणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. २४ तास उपलब्ध राहण्यापेक्षा २४ स्पष्ट उत्तरे देणे अधिक महत्त्वाचे आहे. राहुल गांधींच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होऊ शकतात. सरकार चर्चा करण्यास तयार असताना विरोधकांनी ती नाकारण्याऐवजी संसदेत ठोस प्रश्न मांडून उत्तर मिळवण्याचा प्रयत्न करणे अधिक परिणामकारक ठरू शकते. कारण लोकशाहीत प्रश्न विचारणे जितके महत्त्वाचे, तितकेच मिळालेले उत्तर जनतेसमोर तपासणेही महत्त्वाचे आहे. पण सरकारकडूनही अपेक्षा अधिक आहे. गृह मंत्रालयाच्या अखत्यारीतील पोलिस कारवाईवर प्रश्न उपस्थित झाले असतील, तर जबाबदारीपासून दूर जाण्याऐवजी स्पष्ट तथ्ये, आदेशांची साखळी आणि कारवाईची अधिकृत माहिती संसदेसमोर ठेवणे ही सरकारची जबाबदारी आहे. आजचा खरा प्रश्न त्यामुळे ''अमित शाह संसदेत बोलणार का?'' हा नाही. खरा प्रश्न आहेअमित शाह नेमके काय स्पष्ट करणार? राजकीय भाषणे, आरोप-प्रत्यारोप आणि घोषणांपलीकडे जाऊन जर सरकारने प्रत्येक गंभीर प्रश्नाचे तथ्याधारित उत्तर दिले, तर संसदेतला गोंधळ कमी होऊ शकतो. अन्यथा ''उत्तर देण्याची तयारी'' ही केवळ राजकीय रणनीती म्हणून पाहिली जाईल. लोकशाहीत जनतेला भाषण नको असते; तिला सत्य हवे असते. आणि म्हणूनच अमित शाह यांनी प्रश्नांना उत्तर देण्यापूर्वी नव्हे, तर प्रश्नाच्या केंद्रस्थानी असलेल्या मुद्द्यावर स्पष्ट भूमिका मांडणे गरजेचे आहे.

# गेवराईतील शिवसेना संवाद मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहा

## बीड जिल्हाप्रमुख ॲड.चंद्रकांत आप्पा नवले यांचे आवाहन

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई शहरात दि. १३ ऑगस्ट २०२६, गुरुवार रोजी दुपारी १.०० वाजता शिवसेनेच्या वतीने भव्य कार्यकर्ता संवाद मेळावा व पक्षप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास शिवसेना बीड जिल्हाप्रमुख ॲड.चंद्रकांत आप्पा नवले यांनी सर्व शिवसैनिक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.**

या संवाद मेळाव्यास ना.भरतशेठ गोगावले, मंत्री, रोजगार हमी योजना व फलोत्पादन विभाग, महाराष्ट्र राज्य तथा संपर्कमंत्री, बीड, तसेच मनोज शिंदे, संपर्कप्रमुख, बीड, अशोकजी पटवर्धन, मराठवाडा सचिव आणि बाळासाहेब किसवे, प्रदेशाध्यक्ष ओबीसी, व्हीजेएनटी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. गेवराई शहर व तालुक्यातील शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्याच्या दृष्टीने हा संवाद मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून पक्षाची आगामी वाटचाल, संघटन मजबूत करण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवरही चर्चा होणार आहे. तसेच विविध पक्षांतील पदाधिकारी व कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करणार असल्याने पक्षप्रवेश सोहळ्यालाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



शिवसेनेचा प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाची ताकद आहे. कार्यकर्त्यांच्या अडचणी, सूचना आणि जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत संघटन अधिक मजबूत करण्यासाठी हा संवाद मेळावा महत्त्वाचा आहे. त्यामुळे गेवराई शहर व तालुक्यातील सर्व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अँड. चंद्रकांत आप्पा नवले, जिल्हाप्रमुख शिवसेना, बीड यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी संजय बाबा लकडे, मुकेश महाजन, विक्रम राजे भोसले, नवनाथ गवते, बाळासाहेब खेडकर, बिबीशन मोघे, गणेश पवार, प्रकाश नरनाळे, नागेश मिठे, पाटील सखाराम हाकदार, नेरकर, स्वप्निल आबूज यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत असून, गेवराई तालुक्यातील सर्व शिवसैनिकांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आज गेवराईत पंकजाताई मुंडे, माजलगावात डॉ.प्रीतमताई मुंडे यांच्या उपस्थितीत तिरंगा यात्रा

## देशभक्त व राष्ट्रप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-प्रा.देविदास नागरगोजे

**बीड । प्रतिनिधी**

**स्वतंत्र दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या पुढाकारातून हरघर तिरंगा अभियान व तिरंगा यात्रांचे नियोजन करण्यात आले उद्या दिनांक १३ ऑगस्ट रोजी गेवराई येथे महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री आमदार पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत तर माजलगाव येथे बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ प्रीतम ताई मुंडे यांच्या उपस्थितीत भव्य तिरंगा यात्रा निघणार आहे तरी या दोन्ही यात्रांमध्ये मोठ्या प्रमाणात देशभक्त नागरिक कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आव्हान हर घर तिरंगा व तिरंगा यात्रा अभियानाचे जिल्हा संयोजक प्रा. देविदास नागरगोजे यांनी केले आहे.**

गेवराई व माजलगाव विधानसभेच्या तिरंगा यात्रेची तयारी पूर्ण झाली असून उद्या दिनांक १३ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गेवराई विधानसभेची भव्य तिरगा यात्रा सकाळी १० :०० वाजता गेवराई येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातुन या यात्रेचा आरंभ होणार असुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळ्याला अभिवादन करून पुढे नगरपालिका परिसरात शास्त्रीजींच्या पुतळ्यासमोर या यात्रेचा समारोप होणार आहे .या यात्रेत माजी मंत्री बदाम आबा पंडित, बाळराजे दादा पवार यांच्यासह गेवराई विधानसभा क्षेत्रातील सर्व देशभक्त नागरिक कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून देशभक्तीपर गीते व घोषणांच्या उत्साहात ही रॅली संपन्न होणार आहे तर बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ प्रीतमताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत माजलगाव विधानसभेची तिरंगा यात्रा जुन्या माजलगावातील झेंडा चौकातून मोटर सायकल यात्रा निघणार असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे नवे बस स्टॅन्ड वरून पुढे जाऊन छत्रपती संभाजी महाराज चौकात या रॅलीचा समारोप होणार आहे. माजलगाव येथील या तिरंगा यात्रेत माधवराव निर्मळ, ज्ञानेश्वर नाना मेंडके, अरुण राऊत ,अमरनाथ खुरपे , मंडलाध्यक्ष रूपालीताई कचरे, डॉक्टर अभिजीत साळुंखे व शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी यांच्यासह देशभक्त नागरिक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत तरी या विधानसभेच्या तिरंगा यात्रेमध्ये सर्व देशभक्त नागरिक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे आवाहन तिरंगा यात्रा अभियानाचे जिल्हा संयोजक प्राध्यापक देविदास नागरगोजे यांनी केले आहे.

# चौसाळा ते वाढवणा डांबरीकरण कामाची चौकशी करुन संबंधितावर गुन्हे दाखल करा-जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, शेख मुजीब

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे चौसाळा ते वाढवणा हा रस्ता अत्यंत खराब झाला होता, विविध आंदोलने व पाठपुरावा करून शासनाने या रस्त्यासाठी ५ कोटी निधी उपलब्ध करून दिला व हे काम बीडमधील एका नामांकित एजन्सीला देण्यात आले, त्या एजन्सीने अत्यंत निकुरषट दर्जाचे काम केले असुन एक महिन्याच्या आत हा रस्ता मातीत मिसळून पुर्णतः खराब झाला आहे, यामुळे या भागातील पिंपळगाव घाट ,वाढवणा,चौसाळा, रुईगवहाण,मानेवाडी, इ. गावच्या लोकांनी शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व बीड विधानसभा संपर्कप्रमुख शेख मुजीब भाई यांची भेट घेऊन या कामाची तक्रार केली व न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करा अशी विनंती केली. या लोकांनची दखल घेत जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व शेख मुजीब भाई शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी या सर्व गावच्या लोकांना सोबत घेऊन जिल्हाधिकारी यांची भेट घेतली व सविस्तर निवेदन सादर केले व याचबरोबर चौसाळयापासून एक कि.मी. अंतरावर असणाऱ्या नदीवरील पुलही पुर्णतः वाहून गेला आहे तो पुलही नवीन बांधून द्यावा अशी मागणी करण्यात आली. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी सांगितले की, लोकांची तक्रार ऐकल्यावर मी जिल्हाधिकारी यांना सर्व गावकरी व शिवसेना पदाधिकारी यांना घेऊन भेटलो आहे , जिल्हाधिकारी साहेब यांनी संबंधित एजन्सीची चौकशी करून त्यांचे बील अदा करु नये व हे काम पुन्हा चांगल्या दर्जाचे करायला लावावे नसता येत्या आठ दिवसात संबंधित रस्त्यावर परिसरातील लोकांना सोबत घेऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व संपर्कनेते तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तीव्र रस्ता रोको व इतरही मोठ्या प्रमाणावर आंदोलने करण्यात येणार असल्याचे सांगितले व होणारया परिणामास प्रशासन जबाबदार राहिल याची नोंद घ्यावी असा इशारा देण्यात आला आहे . यावेळी तालूकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, जिल्हासहसचिव श्रीकृष्ण गायके,तालुका सचिव नंदुभाऊ येवले, युवासेना उपजिल्हाप्रमुख अशपाक भाई शेख , उपतालुकाप्रमुख अशोक सगळे , प्रदिप मुळे, शहादेव जोगदंड, रमेश काटे , प्रविण बिबे, पंजाब कळासे, भास्कर कळासे , नितीन साबळे , शशिकांत मुळे , सुरेश कदम,काका मुळे,शेख अजीम भाई , अशोक नाईकवाडे,शैलैश सोनवणे, प्रदिप कुचेकर, किशोर कुचेकर,शंकर सोनवणे,लहु हजारे,शरद गव्हाणे, मोमीन आवेज यांच्यसह चौसाळा परिसरातील लोक व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यात १५ ऑगस्ट रोजी ९.०५ वाजता ध्वजारोहणाचा शासकीय समारंभ

## बीड येथील ध्वजारोहण उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते

**मुंबई । प्रतिनिधी**

**भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यभर उत्साहात साजरा करण्यात येणार असून जिल्हा मुख्यालयात संबंधित पालकमंत्री व मंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाने परिपत्रक जारी केले आहे. राज्याचा मुख्य शासकीय समारंभ मंत्रालय,मुंबई येथे सकाळी ९.०५ वाजता होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येईल. तर पुणे येथे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे.**

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये संबंधित पालकमंत्री व मंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. त्यानुसार उपमुख्यमंत्री एकनाथ गंगुबाई शिंदे (ठाणे),उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार (बीड),चंद्रशेखरप्रभावती कृष्णरावबावनकुळे (नागपूर),राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे-पाटील (अहिल्यानगर),हसन समिना मियालाल मुश्रीफ (नंदुरबार),चंद्रकांतदादा सरस्वती बच्चू पाटील (सांगली),गिरीष गिता दत्तात्रय महाजन (नाशिक),गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक (पालघर),गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील (जळगाव),दादाजी रेशमाबाई दगडू भुसे (अमरावती),संजय प्रमीला दुलीचंद राठोड (यवतमाळ),उदय स्वरुपा रविंद्र सामंत (रत्नागिरी),जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल (धुळे),पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे (जालना),अतुल लिलावती मोरेश्वर सावे (नांदेड),डॉ. अशोक जनाबाई रामाजी वुईके (चंद्रपूर),शंभुराज विजयादेवी शिवाजीराव देसाई (सातारा),ॲड. आशिष मिनल बाबाजी शेलार (मुंबई उपनगर),दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे (वाशिम),शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले (लातूर),जयकुमार कमल भगवानराव गोरे (सोलापूर),नरहरीसावित्रीबाई सिताराम झिरवाळ (हिंगोली),संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट (छत्रपती संभाजीनगर),प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक (धाराशिव),भरत शिवाजी विठाबाई मारुती गोगावले (रायगड),मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील) (बुलढाणा),नितेश निलम नारायण राणे (सिंधुदुर्ग),आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर (अकोला),प्रकाश सुशिला आनंदराव आबिटकर (कोल्हापूर),आशिष उमादेवी नंदकिशोर जयस्वाल (गडचिरोली),माधुरी मिरा सतिश मिसाळ (भंडारा) डॉ. पंकज कांचन राजेश भोयर (वर्धा), मेघना दिपक साकोरे-बोर्डीकर (परभणी) तसेच इंद्रनील अनिता मनोहर नाईक (गोंदिया) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. कोकण विभागीय आयुक्त कार्यालय येथे आदिती वरदा सुनील तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. पालकमंत्री अथवा मंत्री अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकले नाहीत तर विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्त आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी ध्वजारोहण करतील,असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# पान १ वरून...

सातबारावर नाव नसलेल्या

येईल.कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले की, ''राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा अचूक डेटा तयार करून सर्वांना अधिकृत रेकॉर्डवर आणले जाईल. जे खऱ्या अर्थाने शेतकरी आहेत, मात्र तांत्रिक अडचणींमुळे त्यांना कर्जमाफी मिळालेली नाही, अशा सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर विशेष प्रयत्न केले जातील.

------------

राज ठाकरे मुख्यमंत्र्यांच्या

दोन्ही नेत्यांमध्ये काय चर्चा झाली किंवा ही भेट नेमकी कोणत्या कारणासाठी होती, याबाबतची कोणतीही अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. मात्र, मागील काही दिवसांत राज ठाकरे यांनी सरकारवर अनेक गंभीर मुद्दे उपस्थित केले होते.मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था, रस्त्यांवरील खड्डे, जेन-जी आंदोलन आणि नाशिक दौ-यादरम्यान कुंभमेळ्याच्या नियोजनावरून ठाकरेंनी सरकारवर थेट निशाणा साधला होता. या पार्श्वभूमीवर, महामार्ग आणि खड्ड्यांच्या प्रश्नावर मख्यमंत्र्यांशी थेट चर्चा करून लवकरात लवकर तोडगा काढावा, यासाठी राज ठाकरे भेटायला गेल्याचा एक तर्क लावला जात आहे.या भेटीदरम्यान मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक हेदेखील राज ठाकरे यांच्यासोबत उपस्थित होते. राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वीच शिवाजी पार्क मैदानाच्या दुरवस्थेवर प्रश्न उपस्थित केले होते. त्यामुळे नवीन स्टेडियम उभारणीबाबत किंवा शिवाजी पार्क मैदानाच्या विकासाबाबत कोणताही विशेष प्लॅन घेऊन ठाकरे मुख्यमंत्र्यांकडे गेले होते का? अशीही चर्चा रंगू लागली आहे. अचानक झालेल्या या भेटीमुळे राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात उत्सुकता वाढली असून, लवकरच या भेटीचे मुख्य कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

-------------

पेपरफूट गैरप्रकारबाबत केंद्राचा

लागू करण्यासंदर्भात येणाऱ्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.राज्यात किमान २५ हजार सुरक्षित क्लासरुम उभारण्यात याव्यात, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिले. या विविध परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यमान प्रक्रिया आणि त्यातील विविध संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

----------

शिंदे समितीने ५८ नव्हे फक्त

आरक्षणाच्या नोंदी शोधण्यासाठी शिंदे समिती स्थापन केली होती. न्यायमूर्ती शिंदे समितीने आजवर राज्यात शोधलेल्या कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी नोंदी या ५८ लाख ९० हजार १५५ आहे ही वस्तुस्थिती आहे. मात्र, यात ३७ लाख ४७ हजार १४२ नोंदी या जुन्या १९८६ ते २०२३ दरम्यानच्या नोंदी आहे, ज्यांना आधीच ओबीसींचे प्रमाणपत्र मिळाले आहे. ज्याचा मनोज जरांगे यांच्या आंदोलनाशी कुठलाही संबंध नसल्याचे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी म्हटले. मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर न्यायमूर्ती शिंदे समितीला मराठवाड्यात ४९ हजार ३५८ नोंदी आढळल्या आहेत. त्यापैकी फक्त २० हजार १४३ लोकांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केले. तर, १५ हजार ५९७ लोकांना कुणबी म्हणून ओबीसींचे प्रमाणपत्र मिळाले. हेच मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचे यश असल्याचेही बबनराव तायवाडे यांनी सांगितले. शासनाच्या आकडेवारी नुसार न्यायमूर्ती शिंदे समिती नंतर ज्या ३ लाख ११ हजार २८७ लोकांना कुणबी, मराठा कुणबी किंवा कुणबी मराठा असल्याचे जात प्रमाणपत्र देण्यात आले, त्यापैकी २ लाख ९१ हजार १४४ यांनी जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज का केला नाही असा सवाल देखील राष्ट्रीय ओबीसी महासंघाने उपस्थित केला आहे.ज्याच्याकडे कुणबी नोंदीचे कागदपत्र आहे, त्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळालच पाहिजे ही राष्ट्रीय ओबीसी महासंघाची भूमिका आहे. ज्यांना ओबीसींचे प्रमाणपत्र मिळाले त्यांचे राष्ट्रीय ओबीसी महासंघात स्वागत आहे. मात्र, खोट्या कागदपत्रावर जात वैधता प्रमाणपत्र आम्ही सहन करणार नसल्याचेही तायवाडे यांनी स्पष्ट केले.

------------

खासगी रुग्णालयांतील दरमर्यादेचा

ऑप्थॅल्मोलॉजिकल सोसायटीने सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांनी युक्तिवाद केला होता की, देशातील महानगरांमध्ये (मेट्रो शहरांमध्ये) विशेष वैद्यकीय सेवा देणा-या तज्ज्ञ डॉक्टरांकडून लहान शहरांमधील किंवा ग्रामीण भागांतील डॉक्टरांप्रमाणेच समान शुल्क आकारण्याची अपेक्षा करणे अयोग्य आहे.एप्रिल २०२४ मध्ये न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठासमोर या याचिकेची पहिली सुनावणी झाली होती. त्यावेळी खंडपीठाने नमूद केले होते की, खासगी रुग्णालयांना अनेकदा गरिबांसाठी खाटा राखीव ठेवण्याच्या अटीवर सवलतीच्या दरात जमिनी मिळतात, परंतु अशी रुग्णालये या अटीचे पालन करत नाहीत. यावर न्यायालयाने केंद्राला उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले होते.केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्ट करण्यात आले आहे की, नियमानुसार, केंद्र सरकारने राज्यांच्या सल्लामसलतीने निश्चित केलेल्या दरमर्यादेतच रुग्णालयांना वैद्यकीय उपचारांचे शुल्क आकारणे बंधनकारक आहे. नियम ९ २ चे समर्थन करताना स्पष्ट केले की, संविधानाच्या अनुच्छेद ४७ अंतर्गत सार्वजनिक आरोग्य सुधारण्याच्या राज्याच्या घटनात्मक कर्तव्याशी हा नियम जोडलेला आहे.

----------

एफडीएची कारवाई; संभाजीनगरमधील

घातक मानले जाणारे 'ट्रान्स फॅट' असते, ज्यामुळे मानवी शरीरात थेट हृदयविकाराचा धोका प्रचंड वाढतो. ही ग्राहकांची उघड फसवणूक आणि दिशाभूल करणारी बाब मानली गेली आहे. सडलेल्या भाज्या, खराब मशरूम अन्? मुदतबाह्य 'पिझ्झा बेस' एफडीएच्या पथकाने हॉटेलच्या चिलिंग सेंटर आणि स्टोअर रूमची पाहणी केली असता तिथे अत्यंत भयानक दृश्य आढळले.काकडी, ढोबळी मिरची, फुलकोबी, पत्ताकोबी यांसारख्या सडलेल्या आणि कुजलेल्या भाज्यांचा साठा आढळून आला. अत्यंत खराब झालेले आणि मुदतबाह्य झालेले मशरूम साठवून ठेवले होते. ग्राहकांसाठी पिझ्झा बनवण्यासाठी वापरला जाणारा 'पिझ्झा बेस' देखील पूर्णपणे मुदतबाह्य झालेला होता.हॉटेलच्या स्वयंपाकघरात कमालीची अस्वच्छता आढळून आली. सार्वजनिक आरोग्यास निर्माण झालेला हा गंभीर धोका पाहता, अन्न व औषध प्रशासनाने कडक पाऊल उचलत हॉटेल अमरप्रीतला कोणत्याही प्रकारच्या अन्नपदार्थांचे उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक, विक्री किंवा ग्राहकांना सर्व्हिस देणे तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

-----------

अमित शाहा संसदेचा सामना

करण्यात आलेल्या लाठीचार्जबाबत काही गंभीर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, विद्यार्थ्यांवर गोळीबार कोणी केला? गोळीबार करण्याचे आदेश नेमके कोणी दिले? एका विद्यार्थ्याचा डोळा फोडणारा आणि दुस-या विद्यार्थ्याच्या कानावर गोळी मारणारा कोण? विद्यार्थ्यांना खिळे लावलेल्या लाठ्यांनी मारहाण करण्याचे आदेश कोणी दिले? हे आदेश कोणाचे होते? असा संतप्त सवाल करत त्यांनी अमित शहांवर टीका केली आहे. राहुल गांधी पुढे म्हणाले की, हे आदेश गृहमंत्रालय आणि दिल्ली पोलिसांच्या माध्यमातून दिले गेले, हे दोन्ही केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अंतर्गत येतात. मग अमित शहा यांनी आमच्या मुलांवर गोळीबार करण्याचे आदेश दिले की नाही? जर त्यांनी हे आदेश दिले असतील, तर ते या गुन्ह्यासाठी जबाबदार आहेत आणि त्यांनी राजीनामा दिला पाहिजे आणि जर त्यांनी हे आदेश दिले नसतील, तरीही त्यांनी राजीनामा दिला पाहिजे, कारण ते आपली यंत्रणा सांभाळण्यात पूर्णपणे अपयशी आणि अकार्यक्षम ठरले आहेत, अशी भूमिका राहुल गांधी यांनी मांडली.पुढे राहुल गांधी म्हणाले की, आता अमित शहा काय बोलत आहेत, याने कोणताही फरक पडत नाही, कारण ते तब्बल वीस दिवस गायब होते. ते संसदेतच होते पण सभागृहाचा सामना करण्याचे टाळत होते. त्यांच्या दिमतीला तीस गाड्यांचा ताफा होता आणि विद्यार्थ्यांच्या रोषापासून वाचण्यासाठी त्यांच्या निवासस्थानाबाहेर हजार पोलिसांचा पहारा उभा करण्यात आला होता, जेणेकरून कोणताही विद्यार्थी तिथे पोहोचू शकणार नाही. राजकीय प्रभावाचा फुगा आता पूर्णपणे फुटला असून, शेवटच्या क्षणी त्यात हवा भरण्याचे कितीही प्रयत्न झाले तरी आता काहीही साध्य होणार नाही. देशाचे गृहमंत्री संसदेचा सामना करण्याचे धाडस दाखवू शकत नाहीत, असा घणाघाती आरोपही राहुल गांधी यांनी केला आहे.

----------

ठाकरेंच्या वकिलांकडून

देण्यासाठीच २०१८ सालची घटना निवडणूक आयोगाने दुर्लक्षित केली.निवडणूक आयोगाने शिवसेनेबाबत स्वीकारलेला दृष्टीकोन कायम राहिला तर कोणतेही सरकार पाडता येईल. एखाद्या पक्षातून काही आमदार फुटली आणि ते स्वतःलाच पक्ष म्हणवतील. ते चिन्हावर आणि पक्षावर दावा करतील. ही पद्धत जर मान्य झाली तर ती लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे, असा मोठा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.न्यायालयात कपिल सिब्बल यांचा युक्तिवाद तीन मुद्द्यावर होता. विधिमंडळातील फूट म्हणजे पक्षातील फूट नाही, निवडणूक आयोगाने २०१८ ची पक्षघटना आणि संघटनात्मक बहुमत दुर्लक्षित केले आणि आयोगाने अधिकारक्षेत्राचा वापर करण्यापूर्वी आवश्यक असलेली प्रथमदर्शनी राजकीय फूट सिद्ध झाली नव्हती, असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला.निवडणूक आयोगाने २०१८ च्या शिवसेना पक्षघटनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले सिब्बल यांच्या मते, २०१८ ची घटना आयोगाकडे सादर करण्यात आली होती. त्यावर आयोगाचा शिक्काही होता. तरीही ती रेकॉर्डवर नसल्याचा दावा करून आयोगाने चुकीचा निष्कर्ष काढला. पक्षाची घटना आयोगाकडे नव्हती हा दावा अविश्वसनीय आहे१३ वर्षे पक्षाच्या नोंदणी आणि पदाधिकाऱ्यांच्या नोंदी पाहणाऱ्या निवडणूक आयोगाला शिवसेनेची घटना माहीत नव्हती, हा दावा मान्य होऊ शकत नाही, असे सिब्बल म्हणाले.

------------

नीट परीक्षार्थींना चुकीच्या

पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे. काही तांत्रिक गडबडीमुळे काही उमेदवारांना एसएमएसद्वारे कळवण्यात आलेले परीक्षा केंद्रांचे शहर चुकीचे होते. त्यानंतर योग्य वाटप केलेले परीक्षा केंद्रांचे शहर दर्शवणारे एसएमएस आणि ई-मेल पाठवण्यात आले आहेत असे त्यात म्हटले आहे. योग्य परीक्षा केंद्रांच्या ठिकाणांचा तपशील एनबीईएमएसच्या संकेतस्थळावरील सर्व उमेदवारांच्या अर्जदार पोर्टलवरही उपलब्ध आहे असे बोर्डाने सांगितले.

------------

महाराष्ट्रात तब्बल ४३ लाख

गतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.एका बाजूला शासनाकडून गरजू नागरिकांसाठी रेशन धान्याचे वाटप केले जात असताना दुस-या बाजूला अपात्र लाभार्थी आणि मृत व्यक्तींच्या नावावर धान्य उचलले जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे संशयित रेशन कार्डांची सखोल चौकशी करून पात्र आणि अपात्र लाभार्थ्यांची स्पष्ट पडताळणी करणे गरजेचे आहे. प्रलंबित प्रकरणांवर जलद निर्णय घेऊन दोषी आढळणा-यांवर कठोर कारवाईहोण्याची शक्यता नाकारता येत नाही.

cmyk



दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६






## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात स्वच्छता पंधरवडा निमित्त जनजागृती रॅली

माजलगाव । प्रतिनिधी

म.शि.प्र.मंडळ संचलित सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तसेच जनजागृती साठी रॅलीचे आयोजन करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दि ०१ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत महाविद्यालयात स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एन.के.मुळे,वरिष्ठ महाविद्यालायचे उपप्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.पवनकुमार शिंदे,उपप्राचार्य प्रा.प्रकाश गवते, प्रबंधक डॉ.प्रशांत चव्हाण,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.ओमप्रसाद सारगे,डॉ.अर्चना कचरे,डॉ.सतीश डाके,माजी कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे, डॉ.विलास काळे यांच्यासह प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बुखारी उर्दू शाळेचे शिपाई शेख रशिद हुसैन यांचा सेवापूर्ति सोहळा उत्साहा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी



शहरातील बुखारी उर्दू प्राथमिक शाळेचे शिपाई शेख रशिद हुसैन हे शासनाने निर्धारित केलेल्या वयोमर्यादिनुसार दि ३१ जुलै २०२६ रोजी सेवानिवृत्ति झाले विशेष म्हणजे त्याची संपूर्ण ४० वर्ष शैक्षणिक सेवा ही बुखारी उर्दू प्राथमिक शाळा माजलगांव या एकाच शाळेत पार पाडली त्यांच्या सेवा निवृत्ति निमित्त आयोजित सेवापूर्ति सोहळा माजलगांव येथील बुखारी उर्दू प्राथमिक शाळा येथे उत्साहापूर्ण वातावरणात संपन्न झाला

या कार्यक्रमात प्रमुख उपस्थित संस्थेचे सचिव हाजी खुर्शीद नाईक व शाळेचे मुख्याध्यापक शेख इरफान, हारून सर्व शिक्षक,शिक्षिका वह इतर कर्मचारी वह बुखारी उर्दू प्राथमिक शाळेचे शिपाई त्यांचे मित्र शेख युसूफ भाई, इलियास भाई यांच्या उपस्थित संपन्न झाला

# गड-किल्ल्यांच्या धर्तीवर साकारतेय मच्छिंद्रनाथांचे संजीवन समाधी मंदिर

शरद रेडेकर । आष्टी

आष्टी तालुक्याच्या सीमेवरील गर्भगिरी पर्वतरांगांमध्ये मायंबा-सावरगाव येथे मच्छिंद्रनाथांचे संजीवन समाधी मंदिर गड-किल्ल्यांच्या धर्तीवर साकारण्यात येत आहे. पौराणिक वास्तुशैलीला धक्का न लावता काळ्या पाषाणावर आकर्षक कोरीव काम करून हे भव्य मंदिर उभारले जात असून, या प्रकल्पासाठी सुमारे ७३ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

मंदिराच्या मुख्य समाधीस्थळाची ११ फूट खोलीची पाणी पूर्ण झाली आहे. दीपा मुहूर्तावर विश्वस्त स यांच्या गड-किल्ल्यांच्या धर्तीवर मच्छिंद्रनाथांच्या संजीवन समाधी मंदिराचे काम सुरू आहे. हस्ते सपत्नीक जोते बांधकामासाठी काळ्या पाषाणाची कोरीव शिळा बसविण्यात आली. सुमारे १०० फूट रुंदी, १५० फूट लांबी आणि १०९ फूट शिखर उंची असलेल्या मंदिराचे बांधकाम आगामी साडेतीन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मंदिरासाठी नांदेड जिल्ह्यातून कोरीव कामासाठी योग्य



### ७३ कोटींचा आराखडा : पाषाणावर कोरीव काम

काळा पाषाण आणला आहे. पुण्यातील कुशल कारागिरांकडून दगडावर कलाकुसर करण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, तीन निसर्ग पर्यटनालाही चालना देवस्थान परिसरात जलसंवर्धनाची विविध कामे तसेच पाच हजार वृक्षांची लागवड व संवर्धन करण्यात आले आहे. त्यामुळे धार्मिक पर्यटनासोबतच निसर्ग पर्यटनालाही चालना मिळत आहे. हे मंदिर काळ्या पाषाणात साकारले जाणारे देशातील एकमेव मंदिर ठरणार असल्याचा दावा विश्वस्त मंडळाचे कार्यवाह दादासाहेब चितळे व बाबासाहेब म्हस्के यांनी केला. देवस्थानच्या विकासकामांमुळे भाविकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होत असून, परिसराचे धार्मिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्व वाढत आहे.

मजली प्रशस्त दर्शनबारी, अद्ययावत भक्तनिवास, अन्नछत्रालय आणि स्वच्छतागृहांची कामे अंतिम टप्प्यात आहेत. या गडाचा कायापालट करण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी फार मोठे परिश्रम घेऊन शासन दरबारी पाठपुरावा करत या गडाच्या विविध विकास कामां करीता मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मदतीने खुप निधी खेचून आणला आहे दर महिन्याच्या अमावस्याला लाखो भाविक मच्छिंद्रनाथाच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी गडावर येत आहे आत्तापर्यंत भाविक भक्तांच्या मदतीचा देखील मोठा देणग्याचा ओघ चालु आहे.

## बर्दापूर येथील पाचपीर दर्गा यात्रे निमित्त लाखो हिंदू-मुस्लीम भाविक सहभागी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बर्दापूर येथील ऐतिहासिक असलेल्या पाचपीर दर्गा यात्रा उत्सव बुधवारी दि १२ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात लाखो हिंदू मुस्लिम भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला असून यात्रेसाठी बर्दापूर ग्रामपंचायत ,पोलीस प्रशासन व पाच पीर दर्गा कमिटी च्या वतीने सर्व प्रकारची तयारी करण्यात आली होती पाचपीर दर्गा यात्रे निमित्त जंगी कुस्त्याचा सामना मोठ्या उत्साहात रंगला

अंबाजोगाई-लातूर रोडवर असलेल्या बर्दापूर येथे पाच गावांच्या सीमेवर ऐतिहासिक पाचपीर दर्गा असून दरवर्षी यात्रेनिमित्त लाखो हिंदू मुस्लिम भाविक या यात्रेनिमित्त एकत्रित येतात आपले नवस पूर्ण करतात आणि नवसाला पावणारा पाचपीर दर्गा ही ओळख आहे



या दर्ग्यावर वर्षभर अर्थात दर गुरुवारी व शुक्रवारी कंदुरीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात या ठिकाणी अन्नदान केले जाते यात्रेनिमित्त लाखो भाविक एकत्रित आले तरी रात्रीचा मुक्काम दर्गा परिसरात कोणीही करत नाही भक्ती भावाने येणाऱ्या यात्रेची सुरक्षा बर्दापूर पोलीस स्टेशनच्या अंतर्गत केली जाते व यात्रेसाठी बर्दापूर ग्रामपंचायत तसेच पाचपीर दर्गा कमिटी दक्षतेने कार्य करून पारंपरिक पद्धतीने ही यात्रा यशस्वी करण्याचा प्रयत्न असतो दुपारी बारा वाजता बर्दापूर येथून मानाचा ऐतिहासिक संदल ढोल ताशाच्या गजरात काढला जातो साधारण दोन वाजण्याच्या सुमारास पाचपीर दर्गा संदल चढवला गेला तसेच यावेळी रक्तदान शिबिराचे हे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले होते पाचपीर दर्गा उत्सव समितीच्या वतीने येणाऱ्या भाविकांसाठी लंगर चे आयोजन करण्यात आले होते यावेळी विविध पक्षाचे नेते मंडळी सामाजिक कार्यकर्ते व लाखो भाविक मोठ्या उत्साहाने सहभाग होतात तसेच या यात्रेनिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून कुस्तीचा सामना पाहण्यासाठी व कुस्ती खेळण्यासाठी मोठ्या संख्येत मल्ल उपस्थित राहतात त्यामुळे यावर्षी पाचपीर दर्गा यात्रा व कुस्त्याचा सामना मोठ्या प्रमाणात रंगणार असल्याने बर्दापूर पाचपीर दर्गा यात्रा ऐतिहासिक ठरली आहे.

## पान ६ वरुन...

### 'जेन-झी'चा तिरंगा रॅलीतील

नवनाथ शिराळे, जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले, जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे, बीड शहर मंडळ प्रमुख अशोक लोढा, बीड ग्रामीण मंडळ प्रमुख मनोज पाटील, अशोक रसाळ, डॉ.ज्योती घुंबरे, संध्या राजपूत, मीरा गांधले, विक्रांत हजारी यांच्यासह भाजप पदाधिकारी, नगरसेवक सहभागी झाले होते. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, 'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत राष्ट्रभक्तीची भावना पोहोचविण्याचा प्रयत्न होत आहे. बीड जिल्ह्यात या अभियानाला नागरिकांचा मिळत असलेला प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. विशेषतः युवा पिढीचा सहभाग हा या अभियानाची सकारात्मक आणि अभिमानास्पद बाब आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'हर घर तिरंगा' अभियान ९ ते १७ ऑगस्टदरम्यान देशभर राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे आणि माजी खासदार प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातही विविध उपक्रमांच्या माध्यमातून अभियान राबविण्यात येत आहे, असे सांगून डॉ.क्षीरसागर यांनी छत्रपती संभाजीनगर येथे शुक्रवारी (दि.१४) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणाऱ्या तिरंगा रॅलीमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले. शहरातील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्सपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या रॅलीला नागरिक, विद्यार्थी, शिक्षक आणि भाजप पदाधिकारी-कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**विद्यार्थ्यांसह सामाजिक संघटनांचा सहभाग**

लक्षवेधी तिरंगा रॅलीमध्ये रोटरी क्लब ऑफ बीड, जिल्हा रुग्णालय, आदित्य कॉलेज, सौ. के. एस. के. महाविद्यालय, सैनिक विद्यालय, नर्सिंग कॉलेज यांच्यासह विविध आस्थापनांचे अधिकारी, पदाधिकारी, विद्यार्थी आणि शिक्षकांनीही रॅलीत सहभाग घेतला.

### गारमाळ वस्ती शाळेचे

खेळता खेळता काही अनर्थ घडू शकतो यास जबाबदार कोण? अशा सवाल पालक करीत आहेत. सदरील माहिती गट शिक्षणाधिकारी शिंदे यांना दिल्यानंतर शिंदे यांनी कारवाई करतो असे आश्वासन दिले आहे. गटशिक्षणाधिकारी आता काय कारवाई करतात याकडे गारमाळ वस्तीवरील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. आजपासून शाळा नक्की वेळेवर भरेल व शिक्षक हजर राहतील व ज्ञानदानाचे काम करतील अशी ग्रामस्थांची अपेक्षा आहे.

### रस्ता अपघातात जखमी झालेल्या

गंभीर दखल घेत वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी देखील तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. यामध्ये वनपाल अजय देवगुडे, अमोल घोडके, वन मजूर पोपट पवार आणि वाहन चालक रोहित पुरी वन सेवक शहादेव पवार यांनी मदतकार्य करत सहकार्य केले. प्राणीमित्र आणि वन विभागाच्या या वेळेवर घेतलेल्या शोधामुळे व केलेल्या सामूहिक प्रयत्नांमुळे जखमी मुक्या प्राण्याचा जीव वाचवण्यासाठी मोठी मदत झाली असून, परिसरात या तत्परतेचे कौतुक होत आहे.

### गेवराई-सिरसमार्ग बस

करणाऱ्या वाहनांचा अवलंब करावा लागतो. सिरसमार्ग ते गेवराई नियमित चालणारी बस गेल्या वीस वर्षांपासून बंद असल्याने याचा परिणाम सिरसमार्ग येथील व्यापारपेठेवरही झाला आहे. सिरसमार्ग येथून गेवराई येथे जाण्यासाठी दळणवळण सोईचे व्हावे यासाठी गेवराई आगारातून गेवराई-सिरसमार्ग नियमित बस सुरू करावी, असे निवेदनही गेवराई आगारप्रमुख व तहसीलदार यांना दिले आहे. ही बस सुरू न केल्यास येत्या १५ ऑगस्ट रोजी सकाळी गेवराई तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर सिरसमार्गसह परिसरातील ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

### पोटाची खळगी भरण्यासाठी

चिमुकलीच्या हातातील काठी ही केवळ कसरतीचे साधन नसून गरिबीशी सुरू असलेल्या तिच्या संघर्षाचे प्रतीक बनली आहे.

**धोकादायक खेळ अन् पालकांच्या काळजाचा ठोका**

दोरीवर मुलगी चढल्यानंतर खाली उभ्या असलेल्या आई-वडिलांचे लक्ष क्षणभरही तिच्यावरून हटत नाही. पाय घसरला किंवा तोल गेला तर काही फूट उंचीवरून खाली पडण्याचा धोका असतो. तरीही कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी हा खेळ सुरूच ठेवावा लागतो. दोरीवरचा प्रत्येक पाऊल तिच्या कुटुंबासाठी भाकरीची आशा आहे; पण त्या दोरीच्या पलीकडे तिच्या डोळ्यांत आहे ते सुरक्षित आणि उज्ज्वल बालपणाचे स्वप्न.

## रिधोरी येथे डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त गोशाळेला चारा वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष देवदूत डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसा निमित्त माजलगाव तालुक्यातील रिधोरी येथील श्री रुद्रेश्वर गोशाळेत गोमातांना चारा वाटप करण्याचा सेवाभावी उपक्रम उत्साहात व भक्तिभावाने संपन्न झाला.




देवदूत प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे सदस्य सत्यप्रेम पांडुरंग कोरडे यांच्या पुढाकाराने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजसेवेसोबच गोसेवेचा संदेश देत गोमातेची सेवा करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.या प्रसंगी गोशाळेतील गायींना मोठ्या प्रमाणात हिरवा चारा वाटप करण्यात आला. गोसेवेच्या या उपक्रमाला प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला.यावेळी बोलताना सत्यप्रेम कोरडे म्हणाले, डॉ.ओमप्रकाश शेटे हे सातत्याने समाजसेवा आणि गोसेवेचे कार्य करतात.त्यांच्या वाढदिवसानिमित्त गोमातेची सेवा करण्याचा हा छोटासा प्रयत्न त्यांच्या समाजसेवी विचारांना अभिवादन करणारा आहे.या उपक्रमातून 'सेवा हीच खरी श्रद्धा' हा संदेश देत डॉ. शेटे यांचा वाढदिवस सामाजिक आणि सेवाभावी उपक्रमाने साजरा करण्यात आला.

## नाथापूर येथे संत नामदेव महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

नाथापूर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नाथापूर येथे दर वर्षी प्रमाणे याही वर्षी संत शिरोमणी नामदेव महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात संपन्न झाली .या प्रसंगी श्री ह . भ . प .रामेश्वर महाराज मते यांचे कीर्तन झाले.शिंपी याचे कुळी माझा जन्म झाला ।। परी हेतू गुंतला सदाशिवी ।।१ ।। या अभंगावर त्यांनी संत नामदेव महाराजांच्या आठवणी वर उजाळा दिला .मला गावात होतोइतर संताप्रमाणे विठ्ठला वर किती भक्ती होती हे दृष्टांतातून सांगितले . संत नामदेव महाराजांचा समाज वर्ग बराच असून जुने नाथापूर येथे हनुमान मंदिरा शेजारी भव्य दिव्य मंदिर उभारलेले आहे .याप्रसंगी



परिसरातून श्री ह भ प प्रल्हाद महाराज फटांगडे श्री ह भ प कल्याण महाराज देवडकर श्री अंगदपठाडे महाराज श्री जगन्नाथ दुबाल ले श्री तुकाराम दुबाले श्री आसाराम काठवडे श्री विकासनिर्मळ बहुसंख्य भावी भक्त उपस्थित होते .शेवटी महाप्रसादाचा सर्वांनी लाभ घेतला . याप्रसंगी श्री गणेश पिसे, बबन बोधे,गणेश बोधे,महादेव सटाले, अजय सातपुते कल्याण पिसे महेश खुरुद गणेश,गणेश खुरुद आदिनी खूप परिश्रम घेतले .

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि.बीड**
**(दंड विभाग)**

दुरध्वनीक्र. ०२४४७-२६२१४९
ईमेल-tahsildargeorai2gmail.com

क्र.२०२६/दंड/कावि-दिनांक ०५.०८.२०२६

प्रती,

१ पोलीस निरीक्षक, पो. स्टे गेवराई चकलांबा/तलवाडा

२. ग्राम महसूल अधिकारी रेवकी

विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.

संदर्भ:-१. शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ईऑ९९११ ८१)/ प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. अर्जदार पोपट रामचंद्र बाबरे रा. रेवकी ता. गेवराई यांचा अर्ज दिनांक ०३.०८.२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास सादर करण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ अर्जदार पोपट रामचंद्र बाबरे रा.रेवकी ता. गेवराई यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा मुलगा गोकुळ पोपट बाबरे यांचा जन्म् दिनांक २०.०५.२००८ रोजी रेवकी येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा मंडळ अधिकारी/ग्राम महसूल अधिकारी यांनी करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्यात यावे.

**आदेशावरुन,**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

## संस्कार विद्यालयात विद्यार्थ्यांनी घेतली नशामुक्तीची प्रतिज्ञा; रोटरी क्लब ऑफ बीड पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

संस्कार विद्यालय बीड येथे '१० कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा अभियान' अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. ब्रह्मकुमारी प्रज्ञा दीदी यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे दुष्परिणाम, व्यसनमुक्तीचे महत्त्व तसेच निरोगी आणि सकारात्मक जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ बीड चे पदाधिकारी सूरज लाहोटी, संतोष पवार, अभय पटवारी, प्रमोद करमाळकर यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना व्यसनामुळे व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांची माहिती देण्यात आली. तसेच व्यसनांपासून दूर राहून सकारात्मक विचार आणि



निरोगी जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून स्वतः दूर राहण्याचा संकल्प केला. त्याचबरोबर आपल्या कुटुंबातील सदस्य, मित्र आणि परिसरातील नागरिकांमध्येही व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्याचा निर्धार व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा संदेश समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचविण्यावर यावेळी भर देण्यात आला.

'नशामुक्त भारत अभियान हे जगाचे स्वप्न आहे' या संदेशातून विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त, सुदृढ आणि संस्कारक्षम समाजाच्या निर्मितीसाठी योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, आरोग्य आणि सकारात्मक विचारांना प्राधान्य देण्याचा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला.

**नशामुक्तीचा विद्यार्थ्यांनी घेतला संकल्प**

संस्कार विद्यालयात आयोजित '१० कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा अभियानात' विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहण्याचा दृढ संकल्प केला. ब्रह्मकुमारी प्रज्ञा दीदी यांनी व्यसनांचे दुष्परिणाम आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी स्वतः व्यसनमुक्त राहण्यासोबतच कुटुंब, मित्र आणि समाजातही नशामुक्तीचा संदेश पोहोचविण्याचा निर्धार केला. नशामुक्त युवा आणि सशक्त भारताच्या निर्मितीसाठी विद्यार्थ्यांनी सकारात्मक जीवनशैली स्वीकारावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना व्यसनमुक्त जीवनासाठी मार्गदर्शन केले.

cmyk





# किसान क्रेडीट कार्डधारक पशुपालकांची संख्या ५०.४२ लाखांवर !

दिल्ली : देशात मागील चार वर्षांत किसान क्रेडीटधारक पशुपालकांची संख्या वाढला आहे. त्यामुळे पशुपालन क्षेत्रात संस्थात्मक कर्ज, दूध उत्पादन, वैज्ञानिक पशुप्रजनन आणि पशू आरोग्य सेवांमध्ये सुधारणा झाल्याचे केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी संसदेत सांगितले आहे.

केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी स्पष्ट केले की, किसान क्रेडिट कार्ड योजनेअंतर्गत पशुपालकांची संख्या २०२१-२२ मधील १५.०८ लाखांवरून २०२५-२६ मध्ये ५०.४२ लाखांवर पोहोचली आहे. म्हणजेच चार वर्षांत केसीसी योजनेशी जोडलेल्या पशुपालकांची संख्या तीन पटीहून अधिक वाढली आहे. त्यामुळे पशुपालकांना संस्थात्मक कर्जाचा लाभ मिळत आहे, असा दावा त्यांनी केला आहे. केंद्रीय मंत्र्यांनी उत्तरात देशातील दूध उत्पादनात वाढ झाल्याचे नमूद केले आहे. २०२४-२५ मध्ये देशाचे दूध उत्पादन २४७.८७ दशलक्ष टनांवर पोहोचले असून हे उत्पादन देशातील अंदाजित २४३ दशलक्ष टनांच्या देशांतर्गत

**केंद्र सरकारची संसदेत माहिती**




मागणीपेक्षा अधिक आहे. तसेच २०२५-२६ मध्ये दुग्धजन्य पदार्थांची निर्यात ४०७.१८ दशलक्ष डॉलर इतकी झाली आहे. तर दूध उत्पादनातील सातत्यपूर्ण वाढ आणि पशुधन व्यवस्थापनातील सुधारणा यामुळे भविष्यात दुग्धव्यवसायाची निर्यात क्षमता आणखी वाढू शकते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.तसेच राष्ट्रीय गोकुळ मिशन योजनेतून स्वदेशी गोवंशाच्या जातींचे संवर्धन-विकास, पशुधनाची आनुवंशिक गुणवत्ता, दूध उत्पादन आणि उत्पादकता वाढवण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आल्याचे केंद्रीय मंत्र्यांनी नमूद केले. तसेच या माध्यमातून दुग्धव्यवसाय अधिक फायदेशीर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याचबरोबर पशुपालकांचे उत्पन्न वाढवणे आणि अधिक चांगल्या गुणवत्तेच्या पशुधनाचा विकास करण्यावरही भर दिला जात असल्याचा दावा त्यांनी केला.

पशुधनामुळे होणारे आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी केंद्र सरकार पशुधन आरोग्य आणि रोग नियंत्रण कार्यक्रम राबवत आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना लाळ्या-खुरकत, ब्रुसेलोसिस, पीपीआर आणि क्लासिकल स्वाइन फीव्हर यांसारख्या आजारांच्या लसीकरणासाठी १०० टक्के आर्थिक मदत दिली जाते.इतर पशुरोगांचे नियंत्रण, नव्याने उद्भवणाऱ्या आजारांना प्रतिबंध, प्रयोगशाळांचे बळकटीकरण, रोग निरीक्षण, प्रशिक्षण आणि जनजागृती कार्यक्रमांसाठीही मदत केली जाते, असेही त्यांनी उत्तरात स्पष्ट केले.संस्थात्मक कर्ज, वैज्ञानिक पशुप्रजनन, चारा व्यवस्थापन, पशुरोग नियंत्रण आणि पशुवैद्यकीय सेवा यांचा एकत्रित परिणाम पशुधनाची उत्पादकता वाढवण्यासाठी होईल, असा केंद्र सरकारचा दावा आहे. त्यामुळे ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न वाढण्यास, रोजगाराच्या संधी निर्माण होण्यास आणि देशातील पशुपालन क्षेत्र अधिक मजबूत व टिकाऊ होण्यास मदत होईल, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

## कंदमाशीला आळा घालण्यासाठी करा हे उपाय



कंदमाशी : कंदमाशी ही हळद पिकावरील नुकसान करणारी प्रमुख कीड आहे. कंदमाशीचा प्रौढ डासासारखा परंतु मुंगळ्याप्रमाणे आकाराने मोठा व काळसर रंगाचा असतो. प्रौढ माशीचे पाय शरीरापेक्षा लांब असतात. पायांची पुढील टोके पांढऱ्या रंगाची असतात. दोन्ही पंख पातळ व पारदर्शक असून, त्यांच्यावर राखाडी रंगाचे दोन ठिपके असतात. ज्या ठिकाणी हळदीचे कंद उघडे पडलेले असतील त्या ठिकाणी जमिनीलगत प्रौढ माशी अंडी देते व अशा अंड्यातून अळ्या बाहेर पडून उघड्या गड्डयामध्ये शिरून त्यांच्यावर उपजीविका करतात. अशा गड्डयामध्ये नंतर बुरशीजन्य रोगांचा आणि काही सुत्रकृमींचा शिरकाव होतो. त्यामध्ये खोड व गुद्दे मऊ होतात व त्यांना पाणी सुटून ते कुजतात. जास्ती दिवस लांबलेला पावसाळा कंदमाशीसाठी अधिक प्रमाणात अनुकूल असतो. वेळीच लक्ष दिले नाही तर या कीडीमुळे हळद पिकामध्ये ४५ ते ५० टक्के नुकसान होते. ही कीड जुलै-ऑगस्ट ते पिकाच्या काढणीपर्यंत नुकसान करते.

व्यवस्थापनाचे उपाय : जुलै ते ऑक्टोंबर दरम्यान १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% टक्के २० मि.ली. किंवा डायमिथोएट ३० टक्के १० मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे सोबत चांगल्या दर्जाचे स्टिकर मिसळून आलटुन-पालटून फवारावे. उघडे पडेलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. वेळेवर हळदीची भरणी करावी. तसेच जमिनीतून क्लोरपायरीफॉस ५० टक्के ५० मि.लि. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन आळवणी करावी. याच पद्धतीने आळवणी एक महिन्याच्या अंतराने प्रत्येक महिन्यात एकदा करावी. कंदमाशी मुळे कंद कूज झाली असल्यास मुख्य किटकनाशकासोबत एका बुरशीनाशकाची तज्ज्ञांच्या सल्ल्याने मिसळून आळवणी करावी. त्याचबरोबर एकरी २-३ पसरट तोंडाची भांडी वापरून प्रत्येक भांड्यात एरंडीचे २०० ग्रॅम भरडलेले बी घेऊन त्यात १ ते १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी या मिश्रणामध्ये तयार होणाऱ्या विशिष्ट गंधाकडे कंदमाशीचे प्रौढ आकर्षित होतात व त्यात पडून मरतात. हळद पीक काढल्यानंतर शेतात राहिलेल्या पिकांचे अवशेष, सडके कंद जमा करून नष्ट करावेत.

## कपाशीचे पीक अचानक वाळायला लागल्यास हे करा

कपाशीचे पीक शेतात हिरवेगार दिसत असताना काही झाडे अचानक कोमेजून वाळू लागली तर शेतकऱ्यांची चिंता वाढते. मात्र प्रत्येक वेळी अशी लक्षणे बुरशीजन्य रोगामुळेच दिसतात असे नाही. 'आकस्मिक मर' ही समस्या ओळखणे आणि योग्य वेळी उपाययोजना करणे महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. कपाशीतील आकस्मिक मर : पावसाचे अनियमित वितरण, पावसाचा खंड आणि त्यानंतर कमी कालावधीत मोठ्या प्रमाणात पाऊस अशा परिस्थितीत कपाशीच्या झाडांवर अचानक ताण निर्माण होऊ शकतो. अशा वेळी हिरवेगार दिसणारे पीक काही ठिकाणी अचानक कोमेजून वाळताना दिसते. या परिस्थितीला लगेच बुरशीजन्य रोग समजून औषधांची फवारणी करणे योग्य नाही. कारण कपाशी वाळण्यामागे आकस्मिक मर ही समस्या असू शकते.



आकस्मिक मर येण्याची कारणे : कपाशीच्या पिकाला काही काळ पाण्याचा ताण बसल्यानंतर अचानक मोठा पाऊस झाल्यास किंवा सिंचनामुळे जमिनीत अचानक ओलावा वाढल्यास झाडावर विपरीत परिणाम होऊ शकतो. विशेषतः कडक ऊन आणि त्यानंतर झालेला जोरदार पाऊस यामुळे ही समस्या दिसून येण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत झाडाची मुळे आणि जमिनीतील हवा-पाण्याचे संतुलन बिघडू शकते. परिणामी झाडाला आवश्यक अन्नद्रव्यांचा पुरवठा प्रभावित होऊन झाड अचानक कोमेजल्यासारखे दिसू शकते.

लक्षणे कशी ओळखावीत? : आकस्मिक मरमध्ये कपाशीचे झाड अचानक कोमेजते आणि पाने सुकू लागतात. पुढे पानगळ होऊ शकते. ॲग्रोवनच्या माहितीनुसार, मोठा पाऊस किंवा पाणी मिळाल्यानंतर ३६ ते ४८ तासांत अशी लक्षणे दिसू शकतात. म्हणून शेतकऱ्यांनी पावसानंतर कपाशीच्या शेताची नियमित पाहणी करणे महत्त्वाचे आहे. काही झाडे अचानक वाळताना दिसल्यास परिस्थितीचे योग्य निदान करणे आवश्यक आहे.

पाण्याचा निचरा महत्त्वाचा : शेतात अतिरिक्त पाणी साचले असल्यास त्याचा निचरा करणे ही महत्त्वाची बाब आहे. जास्त पाणी साचल्याने मुळांच्या परिसरातील परिस्थिती बिघडू शकते. त्यामुळे शेतातील पाण्याचा निचरा व्यवस्थित होईल याकडे लक्ष द्यावे. ॲग्रोवनच्या कृषी मार्गदर्शनातही अतिरिक्त पाणी काढण्यावर भर देण्यात आला आहे.

फवारणी करण्याआगोदर निदान करा : कपाशीचे झाड वाळताना दिसले की लगेच बुरशीनाशक फवारणी करणे योग्य ठरेलच असे नाही. प्रत्येक वेळी ही समस्या बुरशीजन्य रोगाची असते असे नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रथम आकस्मिक मर, बुरशीजन्य मर किंवा इतर कारण यातील फरक समजून घेणे आवश्यक आहे. परिस्थिती स्पष्ट नसल्यास कृषी विभाग, कृषी विद्यापीठ किंवा तज्ज्ञांचा सल्ला घेणे अधिक सुरक्षित आहे.

नुकसान टाळण्यासाठी निरीक्षण आवश्यक : पावसाचे बदलते स्वरूप लक्षात घेता कपाशीच्या शेतात नियमित निरीक्षण करणे गरजेचे आहे. विशेषतः पावसाचा मोठा खंड आणि त्यानंतर जोरदार पाऊस झाल्यानंतर झाडांची स्थिती तपासावी. काही भागात झाडे कोमेजत असल्यास संपूर्ण शेतात समस्या किती प्रमाणात आहे, हे पाहणे आवश्यक आहे. कपाशीचे पीक अचानक वाळताना दिसले तर घाबरून न जाता प्रथम त्यामागील कारण समजून घेणे महत्त्वाचे आहे. आकस्मिक मर ही प्रत्येक वेळी बुरशीजन्य रोग नसू शकते. पाण्याचा ताण, त्यानंतर झालेला जोरदार पाऊस आणि जमिनीतील ओलाव्यातील अचानक बदल यामुळे ही समस्या उद्भवू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी पावसानंतर पिकाची पाहणी, अतिरिक्त पाण्याचा निचरा आणि योग्य तज्ज्ञ मार्गदर्शन यांना प्राधान्य द्यावे.

## गळफांदी काढल्यास कापसाच्या उत्पदान वाढीस मदत

कपाशीच्या झाडावरील प्रत्येक फांदी ही उत्पादन देणारीच असते असे नाही. सर्वच फांद्या जोपासत राहिल्यास झाडाची अनावश्यक वाढ होते. त्यात अन्नद्रव्यांचा अपव्यय तर होतोच, पण झाडांची दाटी राहिल्याने रोगांच्या प्रादुर्भावामध्ये वाढ होऊ शकते. परिणामी, अपेक्षित उत्पादन मिळत नाही. संशोधनामध्ये योग्य वेळी गळफांदी काढल्यास झाडाचा अन्नरस फळधारणेकडे वळून, बोंडांची संख्या वाढते. बोंडांचा आकार सुधारतो आणि उत्पादनात लक्षणीय वाढ होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे कापूस पिकामध्ये गळफांदी काढणे हे अत्यंत कमी खर्चाचे, पण जास्त फायदा देणारे व्यवस्थापन तंत्र मानले जात आहे. विशेषतः उच्च घनता लागवड आणि बीटी कपाशीमध्ये या तंत्राचा अवलंब केल्यास उत्पादन वाढीस मदत होते.

गळफांदी म्हणजे काय?

कापसाच्या मुख्य खोडाच्या खालच्या भागातून किंवा पानांच्या बाजूतून / बगलेतून फुटणाऱ्या, फक्त पाने आणि हिरवी वाढ करणाऱ्या पण फळधारणा न करणाऱ्या किंवा कमी प्रमाणात करणाऱ्या फांद्यांना गळफांदी म्हणतात. या फांद्या झाडाला दाट बनवतात आणि मुख्य फळधारक फांद्यांशी पाणी, अन्नद्रव्ये व सूर्यप्रकाशासाठी स्पर्धा करतात.

गळफांदी कशी ओळखाल : मुख्य खोडाच्या तळभागातून बाहेर पडलेली असते. अतिशय वेगाने आणि सरळ वर वाढते. पाने मोठी, गर्द हिरवी व दाट असतात. फुले, पाती किंवा बोंडे नसतात किंवा कमी असतात. फांदी जाड, रसाळ व जोमदार दिसते.



झाडाच्या मध्यभागी गर्दी निर्माण करते.

गळफांदी का काढावी? गळफांदी झाडातील मोठ्या प्रमाणात अन्नद्रव्ये आणि पाणी वापरते. ती काढल्यास हे सर्व अन्नद्रव्य बोंडे आणि फळधारणेसाठी वापरले जाते. गळफांदी काढल्यानंतर झाडाची ऊर्जा फुले, पाती आणि बोंडे तयार करण्यासाठी वापरली जाते. त्यामुळे बोंडांची संख्या वाढते. बोंडे मोठी, वजनदार आणि समान आकाराची तयार होतात. कापसाची प्रत सुधारते. झाडातील दाटी कमी झाल्याने प्रत्येक फांदीपर्यंत सूर्यप्रकाश आणि हवा पोहोचते. त्यामुळे प्रकाशसंश्लेषण चांगले होते. दाट पिकात आर्द्रता जास्त राहते. त्यामुळे बुरशीजन्य रोग, बोंड सड आणि काही किडींचा प्रादुर्भाव वाढतो. गळफांदी काढल्याने हे प्रमाण कमी होते. रसायनांच्या द्रावणाचा प्रत्येक थेंब झाडाच्या कॅनॉपीच्या आतील भागापर्यंत पोहोचतो. त्यामुळे कीड व रोग नियंत्रण अधिक प्रभावी होते. झाडाचा आकार संतुलित राहिल्यामुळे बोंडे वेचणे सोपे होते. आणि मजुरीची बचत होते.

गळफांदी काढण्याची योग्य वेळ : लागवडीनंतर ३५ ते ४५ दिवसांनी पहिली पाहणी करावी. झाडावर ८ ते १० खरी पाने आल्यानंतर छाटणी सुरू करावी. गळफांदी ५ ते १० सें.मी. लांबीची असतानाच काढणे सर्वांत फायदेशीर असते. आवश्यक असल्यास १५ ते २० दिवसांनी पुन्हा निरीक्षण करावे.

गळफांदी काढण्याची योग्य पद्धत : सकाळी किंवा संध्याकाळी छाटणी करावी. लहान गळफांदी हाताने अलगद काढावी. जाड फांद्या धारदार आणि निर्जंतुक सिकेटरने किंवा कात्रीने छाटाव्यात. मुख्य खोडाला इजा होणार नाही, याची दक्षता घ्यावी. एका झाडावरील खूप फांद्या एकाच वेळी काढू नयेत. छाटणीनंतर शेतात पाण्याचा निचरा चांगला राहील, याची काळजी घ्यावी.

गळफांदी काढल्यानंतरची काळजी : संतुलित खत व्यवस्थापन करावे. आवश्यकतेनुसार सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करावी. कीड व रोगांचे नियमित निरीक्षण करावे. गुलाबी बोंड अळीसाठी फेरोमोन सापळे वापरावेत.तण नियंत्रण वेळेवर करावे. पाण्याचा ताण किंवा पाणी साचणे टाळावे.

कोणत्या परिस्थितीत छाटणी टाळावी? सतत पाऊस सुरू असताना. पिकावर पाण्याचा तीव्र ताण असताना. रोगग्रस्त झाडांमध्ये. उशिरा अगदी फळधारणेच्या टप्प्यावर. तिसघन लागवडीमध्ये गळफांदी काढणीचे महत्त्व.

शेतकऱ्यांनी टाळावयाच्या चुका : उत्पादन देणाऱ्या फांद्या चुकून कापणे. उशिरा छाटणी करणे. अस्वच्छ साधनांचा वापर. एकाच वेळी अतिप्रमाणात फांद्या काढणे. छाटणीनंतर कीड-रोग नियंत्रणाकडे दुर्लक्ष करणे. शिफारशीपेक्षा जास्त नत्र खतांचा वापर करून, झाडाची अनावश्यक वाढ वाढवणे.




### महत्वाच्या घटना

१६४२ : क्रिस्टियन हायगेन्स या शास्त्रज्ञाने मंगळाच्या दक्षिण धृवावरील बर्फाच्या टोप्यांचा शोध लावला.

१८९८ : कार्ल गुस्ताव्ह विट याने ४३३ या पृथ्वीजवळच्या पहिल्या लघुग्रहाचा शोध लावला.

१९१८ : बायरिसचे मोटेर्न वेर्के एजी (बी.एम.डब्ल्यू.) ही सार्वजनिक कंपनी म्हणून स्थापन झाली.

१९५४ : रेडिओ पाकिस्तान वरुन 'कौमी तराना' हे पाकिस्तानचे राष्ट्रगीत प्रथमच प्रक्षेपित करण्यात आले.

१९६१ : आपल्या नागरिकांचे पश्चिम जर्मनीत होणारे स्थलांतर रोखण्यासाठी पूर्व जर्मनीने आपल्या सीमा बंद केल्या. बर्लिनची भिंत बांधण्यास सुरूवात झाली.

१९९१ : कन्नड साहित्यिक प्रा. विनायक कृष्ण गोकाक यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर

२००४ : ग्रीसमधील अथेन्स येथे २८ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली. सुमारे ३०० दूरचित्रवाणी वाहिन्यांवरुन अंदाजे ४ अब्ज लोकांनी हा उद्घाटन सोहळा पाहिला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८८ : जॉन लोगे बेअर्ड स्कॉटिश अभियंता आणि दूरचित्रवाणी चे संशोधक (मृत्यू: १४ जून १९४६)

१८९० : त्र्यंबक बापूजी ठोंबरे तथा 'बालकवी' १९०७ साली जळगाव येथे भरलेल्या पहिल्या कविसंमेलनात वयाच्या १७ व्या वर्षी त्यांनी केलेल्या कविताचाचनाने प्रभावित होऊन संमेलनाचे अध्यक्ष कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांनी त्यांना 'बालकवी' ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला. (मृत्यू: ५ मे १९१८)

१८९८ : प्रल्हाद केशव तथा आचार्य अत्रे लेखक, कवी, शिक्षणतज्ज्ञ, संपादक, राजकीय नेते, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, पटकथालेखक आणि वक्ते (मृत्यू: १३ जून १९६९)

१८९९ : सर अल्फ्रेड हिचकॉक चित्रपट दिग्दर्शक (मृत्यू: २९ एप्रिल १९८०)

१९०६ : विनायक चिंतामण तथा विश्राम बेडेकर लेखक व दिग्दर्शक (मृत्यू: ३० आक्टोबर १९९८)

१९२६ : फिडेल कॅस्ट्रो क्यूबाचे १५ वे राष्ट्राध्यक्ष

१९३६ : वैजयंतीमाला बाली ऊर्फ 'वैजयंतीमाला ' चित्रपट अभिनेत्री

१९४५ : भारतीय-इंग्लिश क्रिकेटर रॉबिन जॅकमन यांचा जन्म.

१९८३ : संदीपन चंदा भारताचा ९ वा ग्रँडमास्टर

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९५ : महाराणी अहिल्याबाई होळकर देशातील अनेक महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रातील देवळांचा त्यांनी जीर्णोद्धार केला. (जन्म: ३१ मे १७२५)

१८२६ : स्टेथोस्कोप चे शोधक रेने लायेनेस्क यांचे निधन. (जन्म: १७ फेब्रुवारी १७८१)

१९१० : आधुनिक शुश्रूषा शास्त्राचा (नर्सिंग) पाया घालणार्या ब्रिटिश परिचारिका फ्लॉरेन्स नायटिंगेल यांचा जन्म. १९०७ मधे त्यांना 'ऑर्डर ऑफ मेरिट' हा किताब बहाल करण्यात आला. 'नोटस ऑफ नर्सिंग' हा त्यांचा ग्रंथ नावाजलेला आहे. (जन्म: १२ मे १८२०)

१९१७ : एडवर्ड बकनर आंबवण्याच्या प्रक्रियेसंबंधी केलेल्या संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक (१९०७) मिळवणारे जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: २० मे १८६०)

१९३६ : मॅडम भिकाजी रुस्तुम कामा या भारतीय क्रांतिकारक महिला व परदेशातील भारतीय क्रांतिकारकांच्या आधारस्तंभ होत्या. १९०७ मधे जर्मनीत भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेत ब्रिटिशांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी भारतीय स्वातंत्र्यासंबंधी प्रस्ताव मांडला. त्याच वेळी भारतीय स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून 'वंदे मातरम' हा मंत्र असलेला तिरंगी ध्वज त्यांनी फडकावला. (जन्म: २४ सप्टेंबर १८६१)

१९४६ : एच. जी. वेल्स विज्ञानकथांसाठी प्रसिद्ध असलेले इंग्लिश लेखक (जन्म: २१ सप्टेंबर १८६६)

१९८० : पुरुषोत्तम भास्कर तथा पु. भा. भावे अष्टपैलू आणि प्रतिभासंपन्न साहित्यिक (जन्म: १२ एप्रिल १९१०)

१९८५ : जे. विलार्ड मेरिऑट मेरिऑट कॉर्पोरेशनचे संस्थापक (जन्म: १७ सप्टेंबर १९००)

१९८८ : गजानन जागीरदार चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व अभिनेते, फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्युट ऑफ इंडिया'चे पहिले संचालक

२००० : नाझिया हसन पाकिस्तानी पॉप गायिका (जन्म: ३ एप्रिल १९६५)

२०१५ : हिरो सायकल चे सहसंस्थापक ओम प्रकाश मंजाल यांचे निधन. (जन्म: २६ ऑगस्ट १९२८)

२०१६ : भारतीय हिंदू नेते प्रमुख स्वामी महाराज यांचे निधन. (जन्म: ७ डिसेंबर १९२१)

## १०८ प्रकारचे विशेष बियाणे बाजारात!

नवी दिल्ली : अधिक उत्पन्न देणाऱ्या, बदलत्या हवामानास अधिक अनुकूल व बायो-फोर्टिफाइड १०९ बियाणांचे वाण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशाला अर्पण केले असून हे बियाणे कृषी आणि बागायती पिकांसाठी महत्त्वाचे आहे. या उपक्रमाचा उद्देश कृषी उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा आहे. या जाती भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) विकसित केल्या आहेत आणि त्या एकूण ६१ पिकांच्या आहेत. त्यापैकी ३४ शेतातील पिके आणि २७ बागायती पिके आहेत. पंतप्रधानांनी शेतकरी, शास्त्रज्ञांशी यावेळी संवादही साधला.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले की, शेतकऱ्यांसाठी हा दिवस ऐतिहासिक आहे, कारण ६१ पिकांच्या १०९ जातींचे बियाणे जारी करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास, उत्पादनात वाढ आणि खर्च कमी होण्यास मदत होईल. ते म्हणाले की, या पिकांचे बियाणे हवामानास अनुकूल असून प्रतिकूल हवामानातही चांगले पीक देऊ शकतात. ते म्हणाले की, या जातींमध्ये भरपूर पोषकतत्त्वे आहेत. तृणधान्ये, बाजरी, चारा, तेलबिया, कडधान्ये, ऊस, कापूस आणि फायबर पिके यांचा लागवडीच्या पिकांमध्ये समावेश होतो.

बागायती पिकांमध्ये फळे, भाज्या, मसाले, फुले आणि औषधी वनस्पतींच्या नवीन जातींचा समावेश होतो. पंतप्रधानांनी 'जैव-फोर्टिफाइड' वाणांच्या संवर्धनावर सातत्याने भर दिला असून, कुपोषणाचा सामना करण्यासाठी माध्यान्ह भोजन योजना आणि अंगणवाडी सेवा यासारख्या सरकारी उपक्रमांशी जोडले आहे.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# मानवाप्रमाणेच प्राण्यांच्या जीवाचंही तेच मोल, अशी क्रूरता अक्षम्य

## आरोपीवर तातडीने कारवाई करा; अंबरनाथमधील 'त्या' घटनेची ना. पंकजाताई मुंडेंनी घेतली दखल

मुंबई । प्रतिनिधी

अंबरनाथच्या रॉयल फ्लोरा फेज-२ मध्ये २६ जुलैला बाराव्या मजल्यावरून मांजरीला खाली ढकलून ठार केल्याचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाल्यानंतर या घटनेवर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी ठाणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांना पत्र पाठवून संबंधित व्यक्तीवर तात्काळ कारवाईसाठी पत्र पाठवले आहे. 'प्राण्यांच्या जीवाचे मोल जपणे हे आपले कर्तव्यच आहे, मी स्वतः यात लक्ष घातले आहे, अशी क्रूरता अक्ष्यम आहे' अशा शब्दांत त्यांनी या घटनेवर संताप व्यक्त केला आहे. पोलीस अधीक्षकांना पाठवलेल्या पत्रात पंकजाताई मुंडे यांनी त्या घटनेचा उल्लेख करत नमूद केले आहे, की मांजराच्या लहान पिल्लाला इमारतीवरून एका



व्यक्तीने खाली फेकल्यामुळे मृत्यू झाल्याची बदलापूर येथील घटना निदर्शनास आली आहे.

या विरोधात स्थानिक प्राणिमित्र संघटनांनी कारवाई होत नसल्याने रोष व्यक्त केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियात पसरला आहे. यातील आरोपी व्यक्तीची कृती प्राण्यांविरुद्ध क्रूरता करणारी असल्याने प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० अन्वये दखलपात्र गुन्हा आहे. अशा व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३, कलम ३२५ नुसार कोणत्याही प्राण्याला मग तो पाळीव असो भटका असो किंवा जंगली असो, ठार मारणे, विष देणे, त्याच्या शरीराचा अवयव तोडून त्याला अपंग करणे किंवा त्याला कायमचे निरुपयोगी करणे प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० पीसीए ॲक्ट १९६०च्या कलम ११ (१) अ नुसार प्राण्यांना शारीरिक इजा पोहोचेल अशाप्रकारे मारहाण करणे गुन्हा आहे.तसेच त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त काम करून घेणे किंवा त्यांना विनाकारण वेदना देणे प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० पीसीए ॲक्ट १९६० च्या कलम ११ (१) ल नुसार कोणत्याही प्राण्याला अमानुषपणे अपंग करणे किंवा स्ट्राइकनाईन सारख्या विषारी रसायनांचा वापर करून अथवा विनाकारण क्रूरपणे मारणे या विषयात मी स्वतः लक्ष घालत आहे. मानवाप्रमाणेच प्राण्यांच्या जीवाचं ही तेच मोल आहे, अशी क्रूरता अक्षम्य आहे त्याबाबत त्वरित कार्यवाही करून मला अवगत करावे, असे पंकजाताई मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. या पत्राची प्रत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा प्राणीक्लेश प्रतिबंधक समिती ठाणे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त तथा सदस्य सचिव जिल्हा आणि प्राणीक्लेश प्रतिबंधक समिती जिल्हा ठाणे यांनाही पाठवण्यात आली आहे.

# जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात दाद मागण्यासाठी नवीन अपीलीय प्राधिकरण

मुंबई । प्रतिनिधी

जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात दाद मागण्यासाठी राज्य शासनाने नवीन अपीलीय प्राधिकरण निर्माण केले असून, आता जिल्हा जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात संबंधित विभागाच्या विभागीय आयुक्तांकडे अपील करता येणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे जात पडताळणीच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल झाला असून, अर्जदार तसेच बोगस जात प्रमाणपत्राविरोधात तक्रार करणाऱ्या तक्रारदारांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे ॲड. मंगेश ससाणे यांनी सांगितले. याबाबत बोलताना ॲड. ससाणे म्हणाले की, यापूर्वी जिल्हा जात पडताळणी समितीने एखाद्या प्रकरणात जात प्रमाणपत्र मंजूर अथवा फेटाळल्यास, त्या निर्णयाविरोधात दाद मागण्यासाठी थेट उच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय होता. त्यामुळे संबंधितांना न्यायालयीन प्रक्रियेसाठी वेळ आणि मोठा खर्च करावा लागत होता.

मात्र, महाराष्ट्र शासनाने जात प्रमाणपत्र देण्याच्या व पडताळणीच्या कायद्यात केलेल्या सुधारणेनुसार आता जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात अपील करण्यासाठी स्वतंत्र 'अपील प्राधिकरण' निर्माण करण्यात आले आहे. प्रत्येक महसूल विभागाचे विभागीय आयुक्त हे या अपीलीय प्राधिकरणाच्या भूमिकेत असतील. त्यामुळे जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात संबंधित विभागीय आयुक्तांकडे अपील करता येणार आहे. ''ही आमची अनेक दिवसांची मागणी होती. शासनाने आता त्याची दखल घेतली आहे. या निर्णयामुळे अर्जदार आणि तक्रारदार या दोघांनाही थेट उच्च न्यायालयात जाण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे वेळ आणि आर्थिक खर्च वाचणार आहे.

हा निर्णय अर्जदारांसाठी तसेच बोगस जात प्रमाणपत्रांविरोधात तक्रार करणाऱ्या तक्रारदारांसाठीही महत्त्वाचा आहे,'' असे ॲड. मंगेश ससाणे यांनी स्पष्ट केले. जात प्रमाणपत्रांच्या बाबतीत होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल असल्याचेही त्यांनी नमूद केले. ''बोगसगिरी करून जात प्रमाणपत्रे कशी मिळवली जात आहेत, याची शासनालाही जाणीव होत आहे,'' असे ॲड. ससाणे यांनी सांगितले.

शासनाच्या या निर्णयामुळे जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात दाद मागण्यासाठी एक अतिरिक्त कायदेशीर मार्ग उपलब्ध झाला असून, त्याचा लाभ संबंधित अर्जदार आणि तक्रारदारांना होणार आहे.

# जालन्याची रेशीम कोष बाजारपेठ असेल टॅक्स फ्री

## वैज्ञानिक ग्रेडिंग, ड्रायिंग अन् डिजिटल लिलावाची सुविधा




जालना। प्रतिनिधी

रेशीम कोष विक्रीसाठी शेतकऱ्यांना आता कर्नाटकच्या रामनगर बाजारपेठेपर्यंत जावे लागणार नाही. त्यासाठी जालन्यातच रेशीम कोष बाजारपेठ विकसित करण्यात आली आहे. कर्नाटकच्या बाजारपेठेत १ टक्के शुल्क आकारले जाते. ते येथे माफ राहणार आहे. शिवाय कोषाचे वैज्ञानिक ग्रेडिंग उपलब्ध असेल.ड्रायिंगची अत्याधुनिक सुविधा असेल. लिलाव आणि व्यवहार डिजिटल होतील. येथे शेतकरी आणि व्यापाऱ्यांसाठी निवासाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. १४ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या बाजारपेठेचे उद्घाटन केले जाणार आहे.

जालना बाजार समितीत गेल्या ८ वर्षांपासून सुरू असलेली ही रेशीम कोष बाजारपेठ आता स्वतःच्या जागेत स्थलांतरित होत आहे. १४ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या बाजारपेठेचे उद्घाटन होईल.२०१८ पासून सुरू असलेल्या या बाजारपेठेत आतापर्यंत ३७,८७१ शेतकऱ्यांनी रेशीम कोष विक्रीसाठी आणला आहे. त्यातून ३,२७१.७१ टन कोषांची विक्री करण्यात आली आहे. १५४ कोटी ३२ लाख रुपयांची उलाढाल झाली आहे. आता अडीच एकर क्षेत्रावर ही बाजारपेठ उभारण्यात आली आहे. तुती लागवड, अंडीपुंजनिर्मिती, कीटक संगोपन, कोष उत्पादन, कोष बाजारपेठ, ऑटोमॅटिक रिलिंग,धागा, रंगाई, हातमाग आणि तयार रेशीम वस्त्र अशी संपूर्ण साखळी उभारली जात आहे. त्यामुळे 'तुतीच्या शेतापासून जागतिक बाजारपेठेपर्यंत' जालन्याचा रेशीम उद्योग नेण्याचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण महिलांना हातमागाचे प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावरही भर दिला जात आहे. आधुनिक लिलाव हॉल, सॉफ्टवेअरच्या माध्यमातून कोष खरेदी-विक्री प्रक्रिया पारदर्शक होईल.

कोषाला बाजारातील योग्य दर मिळण्यास मदत होईल. गुणवत्ता तपासण्यासाठी ग्रेडिंग व कोष परीक्षण केंद्र आहे. गुणवत्तेनुसार कोषाचे मूल्यांकन होईल. चांगल्या दर्जाच्या कोषाला योग्य भाव मिळेल. जालना हे महाराष्ट्रातील मध्यवर्ती ठिकाण आहे. त्यामुळे मराठवाड्यासह विविध जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना जवळच्या बाजारपेठेत कोष विक्री करता येणार आहे. येथे दूरवरून येणाऱ्या शेतकरी आणि व्यापाऱ्यांसाठी निवास व्यवस्था करण्यात आली आहे. येथे एकाचवेळी १६ शेतकरी मुक्कामासाठी थांबू शकतील.त्यामुळे बाजारपेठेत येऊन व्यवहार पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना सोय होणार आहे.

# हळद उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठी बातमी!

## वसमत हळद संशोधन केंद्र आणि लखनऊच्या केंद्रीय संस्थेदरम्यान ऐतिहासिक सामंजस्य करार

हिंगोली। प्रतिनिधी

वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्राचा उत्तरप्रदेशातील लखनऊ येथील केंद्रीय औषधी आणि सुंगधी वनस्पती संस्थेसोबत सामंजस्य करार झाला असून त्यामुळे आता आधुनिक तंत्रज्ञानाची देवाण घेवाण होणार आहे. महाराष्ट्र राज्यासह भारतातील हळद उत्पादक शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि हळदीला वैज्ञानिक व औद्योगिक च्या माध्यमातून जागतिक स्तरावर नेण्यासाठी एक ऐतिहासिक पाऊल असल्याचे बोलले जात आहे. केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील यांच्या पुढाकारातून हा करार झाला आहे.

उत्तरप्रदेशातील लखनऊ येथील वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद



अंतर्गत केंद्रीय औषधी आणि सुगंधी वनस्पती संस्थेच्या वार्षिक सोहळ्यानिमित्त हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील यांच्या पथकाने बुधवारी ता. १२ भेट दिली आहे. यावेळी त्या ठिकाणचे तंत्रज्ञान, प्रक्रिया यासह इतर बाबींची माहिती घेण्यात आली आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष हेमंत पाटील, वैज्ञानिक पद्मश्री प्रा. अनिलकुमार गुप्ता, वैज्ञानिक शंकर नारायणन, डॉ. राजेश वर्मा, सी- मॅप लखनऊ संचालक डॉ. प्रबोधकुमार त्रिवेदी, वरिष्ठ वैज्ञानिक तथा विभाग प्रमुख डॉ. आर श्रीनिवास्तव, डॉ. ऋषिकेश भिसे, डॉ. महेश कदम, तसेच हळद संशोधन केंद्राचे संशोधक सहयोगी डॉ. अनिकेत पाटील, प्रसाद गंगाखेडकर, राष्ट्रपाल सरोदे यांची उपस्थिती होती.

तसेच लखनऊच्या संस्थेचे मुख्य वैज्ञानिक डॉ. सुदीप टंडन, डॉ. राम स्वरूप वर्मा, डॉ. आर पी बंसल, डॉ.प्रियंका सिंग, अभिषेक सिंग, डॉक्टर रजनी गौतम, डॉक्टर आकांक्षा सिंग, डॉ. रमेश श्रीवास्तव यांच्याशी संवाद साधला. यानंतर दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार झाला. या करारामुळे दोन्ही संस्थांमधील वैज्ञानिक कौशल्य, प्रयोगशाळा आणि संशोधन साधनांची देवाणघेवाण, अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून शेतकऱ्यांची उत्पादकता दुपटीने वाढवणे. लागवड खर्च कमी करणे, काढणी पश्चात योग्य तंत्रज्ञानाचा अवलंब, हळदीमधील कुरकुमीनचे प्रमाण वाढवणे, औषधी, सौंदर्यप्रसाधने व अन्न प्रक्रियेसाठी नवीन उत्पादने तयार करणे. जागतिक बाजारपेठेच्या निकषावर निर्यातीसाठी चालना देणे. यासह इतरही महत्त्वपूर्ण प्रक्रिया उद्योगाबाबत संयुक्तपणे काम केले जाणार आहे. या करारामुळे मराठवाड्यातील हळद क्षेत्राला एक नवी दिशा मिळणार असून शेतकरी व कृषी क्षेत्रातून या निर्णयाचे स्वागत होत आहे.

# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात संभाजीनगरात मोर्चा

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथे अनुसूचित जातीच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाविरोधात बुधवारी भव्य मोर्चा काढण्यात आला. क्रांती चौकातून सुरू झालेल्या या मोर्चात हजारो नागरिक सहभागी झाले होते. आरक्षणातील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी हा मोर्चा विभागीय आयुक्त कार्यालयावर धडकला. या महामोर्चात केवळ पुरुषच नव्हे, तर महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी हातात निळे झेंडे, फलक आणि उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीचे बॅनर घेतले होते. 'जय भीम'च्या घोषणांनी क्रांती चौक परिसर दुमदुमून गेला होता.

क्रांती चौकातून निघालेला हा मोर्चा पैठण गेट, गुलमंडी, सिटी चौक आणि किल्लेअर्क मार्गे विभागीय आयुक्त कार्यालयावर पोहोचला. आंदोलकांनी शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चा काढला. मोर्चातील प्रचंड गर्दी आणि उत्साह पाहता, पोलीस प्रशासनाने सुरक्षेसाठी चोख बंदोबस्त तैनात केला होता. प्रमुख मार्गांवर वाहतुकीत बदल करण्यात आले होते, जेणेकरून कायदा व सुव्यवस्था राखली जाईल.

# तुकाराम मुंडे ग्रंथाचा लोकार्पण सोहळ्यातील मान्यवर व संयोजक समितीचा मातृभूमी कडून सन्मान

बीड। प्रतिनिधी

तुकाराम मुंडे यांच्या जीवनावरील तुकाराम पुस्तकाचे दि. ११ ऑगस्ट २०२६ मंगळवार रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात भव्य लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्सवाच्या वातावरणात संपन्न झाला. मान्यवरांनी सध्याच्या परिस्थितीवर ताशेरे ओढत सभागृहातील प्रेक्षकांची मने जिंकली.

युवा वर्ग, पत्रकार, साहित्यिक, समाजसेवक, ज्येष्ठ नागरिकांनी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह खचाखच भरलेले होते.कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर माजी सनदी अधिकारी श्री. अशोकराव मुंडे, तुकाराम पुस्तकाचे लेखक तथा ज्येष्ठ पत्रकार श्री. शफी पठाण व प्रख्यात लेखक व वक्ते श्री संजय आवटे तसेच सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या जीवन प्रवासावर आधारित तुकाराम ग्रंथांचे लोकार्पण सोहळा आयोजित करणाऱ्या बिंदुसरा सांस्कृतिक ,सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. महादेव धांडे,



प्रमोद मंत्री, सुनील माने पाटील, बप्पा साहेब तळेकर, बाळासाहेब घुमरे, इंजि. गोविंद कदम, प्रा. चाँद पटेल, ॲड जयंतराव राख, सुहास सर्वज्ञ, ॲड.सुरेश वडमारे, ॲड. सादेक शेख,आनंद सारडा, सुरेश माने, रवी उबाळे आदी सहकाऱ्यांचा मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने मुक्त पत्रकार तथा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अजय कांबळे, प्राचार्य डी.जी. तांदळे, लक्ष्मणराव चाटे,बाजीराव ढाकणे, डॉ. लक्ष्मण पवळ, बाळासाहेब खाडे, रवींद्र मुंडे आदींची उपस्थिती होती.

जाहिर प्रगटन

तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि.बीड

(दंड विभाग)

दुरध्वनीक्र. ०२४४७-२६२१४५

e-mail.tahsildargeorai2@gmail.com

क्रं.२०२६/दंड/कावि-

दिनांक ०५.०८.२०२६

प्रती,

१ पोलीस निरीक्षक, पो. स्टे गेवराई / चकलांबा/तलवाडा

२. ग्राम महसूल अधिकारी रेवकी

विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.

संदर्भ:-१. शासन निर्णय क्रमांक जम्रना२५२५/ईऑ९९१११८१)/ प्र.क्र २२/कु. क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. अर्जदार पोपट रामचंद्र बाबरे रा. रेवकी ता. गेवराई यांचा अर्ज दिनांक ०३.०८.२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास सादर करण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ अर्जदार पोपट रामचंद्र बाबरे रा. रेवकी ता. गेवराई यांनी अर्ज देवून अर्जदार यांची मुलगी आरती पोपट बाबरे यांचा जन्म्? दिनांक ०९.०४.२००७ रोजी रेवकी येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रना२५२५/ ईऑ९९१११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो. स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा मंडळ अधिकारी/ग्राम महसूल अधिकारी यांनी करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्यात यावे.

स्वाक्षरित

तालूका दंडाधिकारी गेवराई

# ३० हजार भाविकांचा एकाच वेळी नवकार महामंत्राचा जाप

## आनंदधाममध्ये भक्तीचा महासंगम; 'समर्पण चातुर्मास'मध्ये सकारात्मक ऊर्जेची अनुभूती

अहिल्यानगर। प्रतिनिधी

आत्मकल्याण, श्रद्धा आणि भक्तीचा संगम असलेल्या 'समर्पण चातुर्मास २०२६'मध्ये आनंदधाम परिसरात अभूतपूर्व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. अर्हम विज्जा प्रणेता उपाध्याय प्रवर पूज्य श्री प्रविणऋषीजी यांच्या सान्निध्यात झालेल्या सामूहिक नवकार महामंत्र जापात ३० हजारांहून अधिक भाविकांनी सहभागी होत जवळपास ५ कोटी नवकार महामंत्राचा जाप केला. आबालवृद्धांनी तल्लीनतेने तालासुरात जाप करत पंचपरमेष्ठींना अभिवादन केले. देशभरातील हजारो साधकांनी ऑनलाइन सहभाग नोंदवला.

आनंद तीर्थ समवशरण येथे झालेल्या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी, पूज्य ज्ञानप्रेमविजयजी, पूज्य आलोकऋषीजी, पूज्य तिर्थेशऋषीजी, महासती पूज्य सत्यप्रभाजी, महासती पूज्य अमितज्योतीजी यांची उपस्थिती होती. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार



संग्राम जगताप, आयएएस सुधीरकुमार कोचर, चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी सौरभ बोरा यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.पूज्य प्रविणऋषीजी यांनी नवकार महामंत्राचे महत्त्व सांगताना, श्रद्धेने केलेला जाप मनःशांती, एकाग्रता आणि सकारात्मकता वाढविणारा असल्याचे स्पष्ट केले. अनुष्ठानानंतर अभिमंत्रित पाण्याचे भाविकांनी प्राशन केले. पालकमंत्री विखे पाटील यांनी चातुर्मास हे त्याग व तपस्येचे पर्व असल्याचे सांगत आचार्यश्रींच्या जन्मभूमी शिराळ चिचोंडीच्या रस्त्याचे काम तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. आमदार जगताप यांनी चातुर्मासामुळे नगर शहर भक्तीमय झाल्याचे नमूद केले. सुधीरकुमार कोचर यांनी 'सेवा, संस्कार, सेतू, संवाद, स्नेह' या सूत्रांनी परिवारातील एकोपा दृढ होतो, असे सांगितले. सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले. मंगल पाठाने कार्यक्रमाची सांगता झाली. आनंदधाम परिसरात सामूहिक नवकार महामंत्र जपात सहभागी झालेले भाविक.

# बॉम्बे हायकोर्टाचा अकबरुद्दीन ओवेसींना मोठा धक्का

छ.संभाजीनगर। प्रतिनिधी

ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीनचे नेते आणि आमदार अकबरुद्दीन ओवेसी यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून मोठा झटका बसला आहे. २०११ मध्ये नांदेड येथे झालेल्या एका जाहीर सभेत प्रभू श्रीराम आणि माता कौसल्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी दाखल झालेला फौजदारी खटला रद्द करण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे. न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्या एकल पीठाने ६ ऑगस्ट २०२६ रोजी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

तेलंगणाचे आमदार अकबरुद्दीन ओवेसी यांनी ८ डिसेंबर २०११ रोजी महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर येथे एका निवडणूक रॅलीला संबोधित केले होते. या भाषणादरम्यान त्यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या रामजन्मभूमी निकालाचा संदर्भ देत काही



वादग्रस्त विधाने केली होती. या भाषणाचा व्हिडिओ यूट्यूबवर पाहिल्यानंतर हैदराबादचे आमदार राजासिंह ठाकूर यांनी ओवैसी यांच्याविरोधात खासगी तक्रार दाखल केली. हैदराबाद न्यायालयाने या प्रकरणी कलम १५६(३) अंतर्गत चौकशीचे आदेश दिले, ज्यानंतर हा गुन्हा तपासासाठी नांदेडच्या अर्धापूर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. पोलिसांनी तपास पूर्ण करून १५ मार्च २०२१ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आणि १५ नोव्हेंबर २०२१ रोजी स्थानिक न्यायदंडाधिकाऱ्यांनी ओवैसी यांच्याविरुद्ध समन्स जारी केले होते.

# ‘जेन-झी’चा तिरंगा रॅलीतील उत्साह अभिमानास्पद-डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये ‘हर घर तिरंगा’ रॅलीने वेधले लक्ष; क्षीरसागर दाम्पत्यासह भाजपकडून नियोजन

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रध्वज हा केवळ एक ध्वज नसून तो देशाच्या स्वाभिमानाचे, एकतेचे आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक आहे. आज तिरंगा रॅलीत राष्ट्रध्वज हाती घेऊन चालणाऱ्या ‘जेन-झी’चा सळसळता उत्साह पाहून मन अभिमानाने भरून आले, असे प्रतिपादन भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत बीड शहरात बुधवारी





(दि.१२) तिरंगा रॅली काढण्यात आली. रॅलीच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

या रॅलीत डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, भाजप राज्य परिषद सदस्य ड.सर्जेराव तांदळे, जिल्हा सरचिटणीस प्रा.देविदास नागरगोजे, जिल्हा उपाध्यक्ष ◀◀ पान २ वर

### महापुरुषांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष

महापुरुषांची वेशभूषा साकारणारे विद्यार्थी, तसेच हलगी पथक हे रॅलीचे विशेष आकर्षण ठरले. हातात तिरंगा ध्वज घेत राष्ट्रभक्तीच्या घोषणा देत सहभागी झालेल्या नागरिकांमुळे शहरातील वातावरण देशभक्तिमय झाले. रॅलीच्या पार्श्वभूमीवर बीड पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या तिरंगा रॅलीमध्ये सहभागी व्हावे : शंकर देशमुख

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील ‘हर घर तिरंगा’ अभियान राज्यभर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत आहे. बीडमध्ये तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. मराठवाड्यातील अभूतपूर्व तिरंगा रॅली येत्या शुक्रवारी (दि.१४) छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होत आहे. त्या तिरंगा रॅलीतही नागरिकांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले.

# गारमाळ वस्ती शाळेचे शिक्षक गैरहजर; विद्यार्थी वाऱ्यावर




पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील सौताडा जवळ असलेल्या गारमाळ वस्ती शाळेतील दोन्ही शिक्षक गैरहजर असल्याने या शाळेचे विद्यार्थी वाऱ्यावर सोडण्यात आले. या वस्ती शाळेच्या बाजूला तलाव असून या तलावाजवळ आणि विहीरीजवळ मुले भटकत होती. काही अनुचित प्रकार घडला असता तर याची जबाबदारी कोणाची? असा सवाल पालक करीत आहेत. यातील एक शिक्षक प्रशिक्षणासाठी गेल्याचे सांगण्यात येत असले तरी दुसरा शिक्षक मात्र शाळेत आलाच नाही. ही गंभीर बाब असून याप्रकरणी गटशिक्षण अधिकारी शिंदे यांनी कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

एकीकडे राज्यात मुले शिकली पाहिजेत यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा शासन करत आहे. आणि दुसरीकडे पाटोदा तालुक्यातील दोन चित्र पाहायला मिळत आहेत. एक जरेवाडी येथील आदर्श घेणारी शाळा तर त्याच तालुक्यातील सौताडा गारमाळ वस्ती येथील शाळेवर शिक्षकच हजर नाहीत. सदरील शिक्षकांना पालकांनी फोन केला असता एक शिक्षक ट्रेनिंग तर दुसरा शिक्षक घरी असल्याचे स्पष्टपणे सांगितले. त्यामुळे शाळेत जवळ असणाऱ्या सौताडा साठवण तलाव व एक विहीर जवळ आहे. त्यामुळे लहान मुलांसोबत ◀◀ पान २ वर

# बीडमध्ये ‘नशामुक्त भारत-नशामुक्त बीड’ अभियानाला वेग

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलिसांच्या वतीने ’नशामुक्त भारत अभियान’ अंतर्गत, युवक व विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी १३ ऑगस्ट २०२६ रोजी ’व्यसनमुक्ती जनजागृती व प्रभात फेरी’ आयोजित करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली हा विशेष उपक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमात पोलीस अधीक्षक विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार असून, व्यसनांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम तसेच व्यसनमुक्त जीवनशैलीचे महत्त्व यावर मार्गदर्शन करणार आहेत.

उद्या सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी प्रभात फेरीत सहभागी होऊन जनजागृतीचा संदेश देणार आहेत. ही फेरी ’सूर्या लॉन्स’ येथे समाप्त होईल, जिथे विद्यार्थ्यांचा संवादात्मक मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्यात प्रशासन, पोलीस, शिक्षण व आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, सिव्हिल सर्जन सतीश कुमार सोलंकी, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांची या उपक्रमाला प्रमुख उपस्थिती राहणार आहे.विद्यार्थ्यांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा संदेश कुटुंब व समाजापर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होऊन ’नशामुक्त बीड’च्या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन बीड जिल्हा पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# जय भवानी महाविद्यालयात हर घर तिरंगा अभियानाचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी




पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ९ ऑगस्ट २०२६ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत हर घर तिरंगा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे उद्घाटक मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वासराव कदम यांनी केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉक सदाशिवराव सरकटे प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ आधी सभा सदस्य प्राध्यापक कल्पना घारगे मॅडम क्रीडा विभाग प्रमुख प्राध्यापक प्रवीण शिलेदार सर प्राध्यापक गोपाळराव जी धांडे प्राध्यापक सुनील जाधव प्राध्यापक विनोद कीर्दक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते या अभियानाच्या माध्यमातून तिरंगा रॅली निबंध स्पर्धा वकृत्व स्पर्धा स्वच्छता अभियान हर घर तिरंगा अभियान सेल्फी तिरंगा तिरंग्याची शपथ राष्ट्रीय गीत गायन स्पर्धा इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक व प्राध्यापक लोखंडे या अभियानासाठी परिश्रम घेत आहे महाविद्यालयातील सर्व कर्मचारी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत या अभियानात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपले राष्ट्रीय कार्याचा सहभाग नोंदवावा असे आव्हान प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांनी केले.

# बीडमध्ये गोळीबार; चार राऊंड फायर, एक आरोपी अटक!

बीड । प्रतिनिधी

शहरातील इमामपूर रोड परिसरात जुन्या वादाच्या कारणावरून गोळीबार झाल्याने खळबळ उडाली आहे. यावेळी गोळीबार करणाऱ्या व्यक्तीने चार राऊंड फायर केले. ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीस अटक केली आहे. गेल्या काही दिवसात गोळीबाराच्या घटनेत झालेली वाढ चिंताजनक आहे.

सलीम पेट्रोलपंप, इमामपूर रोड, बीड येथे ही घटना घडली. फिर्यादी शेख मोहम्मद साद शेख हारुण (वय २२, रा. जुना बाजार, हत्तीखाना, बीड) यांच्या तक्रारीवरून सफवान खान महेबुब खान, सय्यद साद, फरदीन, अखलाख (सर्व रा. पेठबीड) यांच्यासह सहा ते सात अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी बीएनएसच्या कलम १०९, ११८(१), १८९(२), १९०, १९१(२), १९१(३) तसेच आर्म्स क्टच्या कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा क्रमांक ३००/२०२६ असून पुढील तपास सपोनि दराडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.दिनांक १२ ऑगस्ट रोजी सकाळी इमामपूर रोडवरील घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली.

# रस्ता अपघातात जखमी झालेल्या गर्भवती हरणीवर यशस्वी उपचार; प्राणीमित्र आणि वन विभागाची तत्परता

पाटोदा । प्रतिनिधी

वैद्याकिन्ही वरून पाटोद्याला मोटार सायकलवरून जात असताना अज्ञात कारने येवलवाडी फाटींजवळ एका गर्भवती हरणीला जोरदार धडक दिली आणि कार चालक घटनास्थळावरून निघून गेला. या अपघातात हरणी गंभीर जखमी झाली होती.

या घटनेची माहिती मिळताच प्राणीमित्र गणेश खाडे (मेजर) यांनी तात्काळ याची दखल घेत घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्यासोबत सत्यम सानप हे देखील उपस्थित होते.

जखमी हरणीची गंभीर अवस्था पाहून तातडीने डॉ. खुळे यांना बोलावण्यात आले. डॉ. खुळे



यांनी न घाबरता हरणावर तातडीने उपचार सुरू केले. हरणीला वेदनाशामक इंजेक्शन देऊन तिची वेदनामुक्ती करण्याचा प्रयत्न करत तिचा जीव वाचवण्यासाठी अथक प्रयत्न करण्यात आले. या घटनेची ◀◀ पान २ वर

# गेवराई-सिरसमार्ग बस वीस वर्षांपासून बंद प्रवाशांचे हाल, स्वातंत्र्यदिनी उपोषणाचा इशारा

बीड, प्रतिनिधी

गेवराई आगारातून सिरसमार्ग गावासाठी सुटणारी एसटी बस गेल्या वीस वर्षापासून बंद आहे. सिरसमार्गसह परिसरातील प्रवाशांना गेवराई येथे ये-जा करण्यासाठी मोठ्या अडचणी येत आहेत. याचा परिणाम सिरसमार्ग येथील व्यापारपेठेवरही झाला आहे. ही बस सुरू करावी नसता स्वातंत्र्य दिनी गेवराई तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थ व प्रवाशांनी दिला आहे.

सिरसमार्ग हे गेवराई तालुक्यातील महत्वाची बाजारपेठ असलेले गाव आहे.

### रस्त्याअभावी बस होती बंद

सिरसमार्ग येथे प्रसिद्ध डॉक्टर, रुग्णालय, शाळा व खरेदीविक्रीसाठी चांगली व्यापारपेठ होती. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून महामार्गावरील सिरसमार्ग फाटा ते सिरसमार्ग हा रस्ता अतिशय खराब झाला होता. याचा परिणाम सिरसमार्ग येथील व्यापारपेठेवरही झाला होता. आता मात्र हा रस्ता दर्जेदार झाला आहे. त्यामुळे गेवराई आगारातून सिरसमार्गसाठी एसटी बस सुरू करावी अशी मागणी मोठ्या प्रमाणावर केली जात आहे.

सिरसमार्ग परिसरातील काळेवाडी, तरटेवाडी, शहाजानपूर, दिमाखवाडी, टाकळगव्हाण व बीड तालुक्यातील बहाद्दरपूर, तांदळवाडी, पारगाव, सोनगाव यासह इतर गावच्या ग्रामस्थांचे सिरसमार्ग येथून गेवराई या तालुक्याच्या ठिकाणी सातत्याने येणे जाणे असते. शिक्षणासाठी विद्यार्थी, खरेदीविक्रीसाठी शेतकरी, व्यावसायिक, औषधोपचारासाठी ज्येष्ठ नागरिक, महिला व मुलांना मादळमोही, गेवराई, संभाजीनगरसाठी सातत्याने जावे लागते. मात्र सिरसमार्ग ते मादळमोही, गेवराई अशी एसटी बस नसल्याने ग्रामस्थांना सिरसमार्ग येथून बीडमार्गे गेवराईला जावे लागते अथवा अवैध प्रवासी वाहतूक ◀◀ पान २ वर

# बालहक्क जनजागृतीसाठी आष्टीत १५ ऑगस्टला वॉकेथॉन

### ध्वजारोहणानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत रॅलीला प्रारंभ; विधिज्ञ, विद्यार्थी, पोलीस व प्रशासकीय अधिकारी सहभागी होणार

आष्टी । प्रतिनिधी

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून प्रत्येक बालकाला स्वातंत्र्य, शिक्षण, संरक्षण आणि न्याय मिळावा, या उद्देशाने तालुका विधी सेवा समिती, आष्टीच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी वॉकेथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ध्वजारोहण समारंभानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत या जनजागृती रॅलीला प्रारंभ होणार आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, तालुका विधी सेवा समिती, आष्टी, वकील संघ आष्टी, तालुका पोलीस प्रशासन तसेच इंटरनॅशनल जस्टिस मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही वॉकेथॉन आयोजित करण्यात आली आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. दिनेश पी. सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

**बालहक्कांबाबत जनजागृतीचा संदेश**

बालमजुरीला प्रतिबंध, बालविवाह रोखणे, बालकांचे संरक्षण ही समाजाची सामूहिक जबाबदारी, लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण, प्रत्येक बालकाला न्यायाचा अधिकार आणि प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार या महत्त्वपूर्ण विषयांवर वॉकेथॉनच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे.

दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, आष्टी येथून आयोजित करण्यात येणाऱ्या या रॅलीत विधिज्ञ, न्यायालयीन कर्मचारी, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, पोलीस कर्मचारी तसेच प्रशासकीय अधिकारी सहभागी होणार आहेत.

विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

बालकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी समाजात जागृती निर्माण करणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे आष्टी तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी या वॉकेथॉनमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तालुका विधी सेवा समितीच्या अध्यक्ष श्रीमती अलका बी. निवारे यांनी केले आहे. ‘प्रत्येक बालकाला स्वातंत्र्य, शिक्षण, संरक्षण आणि न्याय’ हा संदेश घेऊन निघणारी ही वॉकेथॉन बालहक्कांच्या संरक्षणासाठी आष्टीतून व्यापक जनजागृतीचा आवाज बुलंद करणार आहे.

# पोटाची खळगी भरण्यासाठी चिमुकलीची दोरीवर कसरत; हातात काठी, डोळ्यांत मात्र शिक्षणाचे स्वप्न

ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव

एका बाजूला बालपण म्हणजे खेळ, शिक्षण आणि आनंदाचे दिवस; तर दुसऱ्या बाजूला गरिबीच्या परिस्थितीत जगणाऱ्या काही चिमुकल्यांना दोन वेळच्या भाकरीसाठी धोकादायक कसरती कराव्या लागत आहेत. रस्त्याच्या कडेला उभारलेल्या दोन खांबांमध्ये बांधलेल्या उंच दोरीवर चिमुकली हातात काठी घेऊन तोल सांभाळत चालते आणि खाली उभे असलेले आई-वडील नागरिकांकडून मिळणाऱ्या पैशांच्या आशेने तिचा खेळ सुरू ठेवतात.

डोंबारी समाजाची ही पारंपरिक कला पूर्वी गावोगावी जत्रा, यात्रा आणि बाजारपेठांमध्ये मोठ्या उत्साहाने पाहिली जात होती.मात्र आधुनिक मनोरंजनाच्या




साधनांमुळे या खेळाची मागणी कमी झाली आहे. तरीही पिढ्यान्पिढ्या या कलेवर उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांना आजही रस्त्यावर खेळ सादर करूनच पोटाची खळगी भरावी लागत आहे.

दोरीवर चढलेली चिमुकली हातातील लांब काठीच्या मदतीने स्वतःचा तोल सांभाळत एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाते. कधी ती दोरीवर उड्या मारते, तर कधी विविध कसरती करून दाखवते. खाली उभे असलेले प्रेक्षक टाळ्या वाजवत असले तरी त्या टाळ्यांच्या मागे या कुटुंबाची जगण्यासाठीची धडपड दडलेली असते. डोंबारी कुटुंबातील मुलांना लहानपणापासूनच या खेळाचे प्रशिक्षण दिले जाते.अशीच एक दहा वर्षांची मुलगी माजलगाव शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात दि १२ ऑगस्ट बुधवार रोजी दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास ती मुलगी पाच ते सहा फूट उंच दोरीवर काठीच्या मदतीने कसरती करत होती.तिच्या कुटुंबीयांनी शिक्षणासाठी आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे रस्त्यावर खेळ सादर करावा लागत असल्याचे सांगितले. दिवसाला मिळणाऱ्या काहीशे रुपयांत कुटुंबाचा उदरनिर्वाह होत असल्याचेही त्यांनी सांगितले.कसरत करणाऱ्या मुलीला शिकण्याची इच्छा असली तरी गरिबीमुळे तिला दोरीवर कसरत करावी लागत आहे.तिच्या भविष्यातील स्वप्नांपेक्षा आजच्या भाकरीचा प्रश्न मोठा ठरत आहे. त्यामुळे या ◀◀ पान २ वर

### लोककला जपायची की चिमुकल्यांचे बालपण?

डोंबारी कला ही महाराष्ट्रातील पारंपरिक लोककलांपैकी एक आहे.या कलेचे जतन होणे आवश्यक असले तरी त्यासाठी चिमुकल्या मुलांच्या शिक्षणाचा आणि सुरक्षिततेचा बळी जाऊ नये,हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. पारंपरिक कलेला प्रोत्साहन, भटक्या-विमुक्त समाजातील कुटुंबांना स्थिर उपजीविका आणि मुलांना शिक्षणाची संधी मिळाली तर कदाचित उद्याची चिमुकली दोरीवर कसरत करण्याऐवजी शाळेच्या बाकावर बसलेली दिसेल.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26